# आवर्तन

डॉ. भवरलाल जैन अर्थात भाऊंच्या आयुष्यात आजवर कित्येक आव्हाने आली आणि गेली. उद्योगविश्वाची उभारणी करताना काही अवघड वळणे नाकारता येत नाहीत. आजवर आयुष्यात आलेल्या या अवघड वळणांची इत्थंभूत माहिती भाऊंनी जाहीरपणे मांडण्यास कधी मागेपुढे पाहिले नाही. मग यात अमेरिकेतल्या व्यापाऱ्याकडून झालेली फसगत असेल किंवा इलेक्ट्रॉनिक क्षेत्रात कंपनीने गुंतवणूक करण्याचा घेतलेला निर्णय असेल. यशाअगोदर अपयशाची माहिती मोकळेपणाने मांडणारा त्यांचा निर्भीड स्वभाव! आव्हाने कितीही आली, तरी धीरोदात्तपणे त्यांच्यावर मात करणे हा त्यांचा स्थायीभाव झाला. सततच्या कार्यमग्नतेमुळे व कर्तव्यपूर्तीच्या स्वभावामुळे त्यांची एक गंभीर प्रवृत्ती सहकाऱ्यांसमोर आली. या गंभीर प्रवृत्तीमागे त्यांनी आपले हळवे मनही जपले आहे.

भाऊंचे डोळे कधी पाणावल्याचे कोणी पाहिले नसतील... आयुष्यातल्या चढउतारात तेवढ्याच समर्थपणे साथ देणाऱ्या आम्हा सहकाऱ्यांची मायमाऊली तथा बाईंबद्दल 'ती आणि मी' हे आत्मकथनावर हृदगत लिहितानाही ते भावविवश झाले नाहीत. माहीत नाही, का... पण या आत्मकथनाच्या प्रकाशन सोहळ्यात भाऊ अधिक हळवे झाले. आवाज गंभीर झाला... भाऊंच्या ओल्या झालेल्या पापण्यांच्या कडांवर बाईंच्या आठवणींनी अलगद जागा घेतली! भाऊंच्या 'ती आणि मी' चा प्रकाशन सोहळा हे इतरांसाठी निमित्त होते; पण भाऊंसाठी ते एक आवर्तन झाले. मराठी साहित्यक्षेत्रातील दिग्गजांनी या सोहळ्यात 'ती आणि मी' साहित्यकृतीबद्दल मांडलेले विचार हे आणखी नवे आवर्तनच! या सोहळ्यातील मान्यवरांची भाषणं, त्यांचे विचार, पुस्तकावर आलेल्या प्रतिक्रिया हे आणखी वेगळे साहित्य झाले. हे सर्व सहकाऱ्यांनी वाचलेच पाहिजे, त्यासाठी विशेषांकाचे हे एक प्रयोजन. बाईंनी जपलेल्या संस्काराची ही शिदोरी भाऊंनी लिहिलेल्या 'ती आणि मी' च्या माध्यमातून आपल्या कुटुंबापर्यंत पोहचावी, ही अपेक्षा...

**–संपादक**

## प्रकाशन वृत्तांत


# ती आणि मी

**दि. २८ डिसेंबर २००९ रोजी मुंबई येथील रवींद्र नाट्यमंदिराच्या पु.ल.देशपांडे सभागृहात 'ती आणि मी'चे प्रकाशन झाले. डॉ. विजया राजाध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्याया सोहळ्यास ज्येष्ठ साहित्यिक डॉ. भालचंद्र नेमाडे, पद्मभूषण माजी न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी, पद्मश्री ना.धों.महानोर, ज्येष्ठ संपादक तथा खा.भारतकुमार राऊत आदी मान्यवर उपस्थित होते. त्या सोहळ्याचा हा वृत्तांत...**



**'ती आणि मी'** या आत्मकथनाला चरित्र, आत्मचरित्राच्या पल्याड असलेले मुक्त स्वरूप आले असून या लिखाणावरून लेखकाची केवळ सैधांतिक बैठकच नव्हे, तर एक नैसर्गिक दृष्टिकोनही स्पष्ट होतो, असे गौरवोद्गार ज्येष्ठ साहित्यिका डॉ. विजया राजाध्यक्ष यांनी काढले. या पुस्तकाने अस्सल भारतीयपण जपूनही वैश्विक चिंतनाचा आवाका साध्य केला असून लेखक पुरुष असतानाही स्त्रीच्या संवेदनाला यात मुक्त स्वरूप आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. बहुप्रतिक्षित असलेल्या 'ती आणि मी'चे रवींद्र नाट्यमंदिरातील पु.ल. देशपांडे सभागृहात डॉ. विजया राजाध्यक्ष यांच्या हस्ते एका शानदार समारंभात प्रकाशन झाले. यावेळी पद्मभूषण माजी न्यायमूर्ती चंद्रोखर धर्माधिकारी, पद्मश्री ना.धों. महानोर, खासदार भारतकुमार राऊत, प्रा. डॉ. भालचंद्र नेमाडे आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

हे पुस्तक केवळ आत्मकथनापुरते मर्यादित नसून, भारतीय सांस्कृतिक मूल्याचे ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून मोलाचे असून, भवरलाल जैन यांनी अत्यंत कुशलतेने एकत्र कुटुंबपद्धतीचे व स्वतःच्या धर्मपत्नीचे योगदान अधोरेखित केले आहे. हे लिखाण स्त्रीमुक्ती चळवळीलाही समाधान देणारे असून, उद्योजक असूनही लेखक म्हणूनही त्यांनी आपली वैचारिक बैठक व साहित्यप्रांतातील साधनेची प्रचीती दिली असल्याचे त्या म्हणाल्या. या पुस्तकातील निवेदन हे प्रथम पुरुषी वाटत नाही. आवाज द्विमुखी आहे. एवढेच नव्हे; तर हा आवाज बहुमुखी ठरला आहे. लेखकाने स्त्री तत्त्वाच्या खिडकीतून 'मी' पणाला सीमित ठेवले आहे. पत्नीच्या योगदानाचे मूल्य जाहीरपणे कबूल करित भवरलाल जैन यांनी स्वतःची ओळख कांताबाईचा पती म्हणून व्हावी, अशी इच्छा प्रदर्शित केली असून, हा त्यांचा मोठेपणा असल्याचे डॉ. राजाध्यक्ष यांनी सांगितले. या पुस्तकात कोणतीही गोष्ट मी ओढूनताणून लिहिली नाही. यात कुठेही अलंकार येऊ दिला नाही. जे आहे ते स्वच्छपणे लिहिले असल्याचे भाऊंनी उपस्थित श्रोत्यांसमोर विचार मांडले केले. हे पुस्तक लिहिण्याअगोदर दोन वर्षे मी विचार करीत होतो. या विचारानंतर दीड वर्षाचा कालावधी या लेखनास लागला. खरे म्हणजे हे पुस्तक माझ्या धर्मपत्नीवर लिहिले असल्याने याचे प्रकाशन अशा सोहळ्यात केलेले तिला आवडेल का, असा प्रश्न सतत मला पिंगा घालत असल्याचे सांगत त्यांनी आपल्या भावनेला वाट मोकळी करून दिली. व्यवसायाच्या निमित्ताने सुरवातीच्या काळापासून मला जास्त वेळ कामातच राहावे लागले. आमच्या जवळपास पंचेचाळीस वर्षांच्या सहजीवनात कदाचित आम्हा पती-पत्नीचा संवाद पंचेचाळीस तास झाला असेल. असे असले तरी नजरेतल्या भाषेने आमचा संवाद प्रगल्भ होता. आंतरिक जीव एकत्र असले, तर शब्दांनी जे साध्य होणार नाही, ते सर्व मिळते. तिचे जगणे हे जे काही योग्य असेल त्या विचारांना घेऊनच होते. ती असती तर तिने लिहू दिले असते का, हा प्रश्न आजही माझ्यासमोर उभा राहतो. आयुष्यात आलेल्या अनेक चढ-उतारात तिची खंबीर साथ असूनही शेवटच्या क्षणी मात्र मला तिची मला निरोप घेण्याची इच्छा पूर्ण करता आली नसल्याची खंत त्यांनी बोलून दाखविली. तिने अधिक जगावे यासाठी मी हा निरोप घेण्याचे टाळले, असे त्यांनी स्पष्ट केले. पुस्तक, माणूस, शब्द आणि भावना या विश्वाचा तुफान मिलाप म्हणजे 'ती आणि मी'. या पुस्तकाच्या नावात 'मी' जरा असला तरी कुठेही 'मी' पणाचे यात दर्शन होत नाही. अनेक आत्मकथने ही डायरीचे पाने असल्याने यात पारदर्शकता येत नाही. या सर्व परंपरेला छेद देत भाऊंनी




या पुस्तकाच्या माध्यमातून आत्मकथन कसे असावे, याचे आदर्श उदाहरण दिले असल्याचे ज्येष्ठ पत्रकार तथा खासदार भारतकुमार राऊत यांनी सांगितले. 'ती' मधून 'मी'चा उदय यात झाल्यामुळे खऱ्या अर्थाने लेखकाने 'मी' पणाची बोळवण केली आहे. सर्वसामान्य लोकांना उद्योजकांचे केवळ खिसे दिसतात; पण भवरलाल जैन याला अपवाद ठरले आहेत. हे पुस्तक वाचताना त्यांच्या मनाच्या मोठेपणाचा प्रत्यय येतो. या पुस्तकातील 'ती' मधून भारतीय संस्कृतीचे प्रतीक दिसून येत असल्याचे भारतकुमार राऊत यांनी सांगितले. उद्योजकांचे एक वैशिष्ट्य असते. समाजात कोठे काय चालले आहे, याची त्यांना उत्तम जाण असते. भवरलाल जैन यांनी ही जाण आता लेखणीच्या सहाय्याने मांडायला सुरवात केली आहे. उद्योजकांचे लेखनक्षेत्रातील जग वाढले पाहिजे अशी अपेक्षा प्रा. डॉ. भालचंद्र नेमाडे यांनी व्यक्त केली. ग्रामसंस्था व कुटुंबसंस्था ही भारतीय संस्कृतीची मोठी देणगी इंग्रजांनी मोडीत काढण्यासाठी प्रयत्न केले. गौतम बुद्ध, महावीर, तीर्थंकरांसारखी मोठी माणसे ही एकत्र कुटुंबसंस्थेतूनच आली आहेत. आजच्या घडीला ही कुटुंबसंस्थाच नाहीशी होत चालली आहे. या पार्श्वभूमीवर भवरलाल जैन यांनी 'ती आणि मी' मध्ये कुटुंबव्यवस्थेतील 'ती' च्या योगदानाला जपत पुन्हा एकदा एकत्र कुटुंबसंस्थेचे महत्त्व उत्तम प्रकारे वाचकांच्या हाती दिले असल्याचे ते म्हणाले. वास्तविक पाहता आत्मचरित्र लिहिता लिहिता चरित्र लिहिणे हे फार थोड्या साहित्यिकांना जमते. या थोड्या साहित्यिकांत भाऊंचा आवर्जून समावेश करावा लागेल. जागतिक पातळीवरील सामाजिक व्यवस्थेचा आढावा घेत त्यांनी या पुस्तकात हाताळलेल्या वैवाहिक तत्त्वासह भारतीय कुटुंबात असलेल्या महिलांच्या योगदानावर प्रकाश टाकला. या पुस्तकाच्या माध्यमातून भाऊंनी भांडवली गुंतवणुकीपेक्षा कुटुंबातील महिलांकडून केल्या जाणाऱ्या कामाची गुंतवणूक मोठी असल्याचेच सिद्ध केल्याचे भालचंद्र नेमाडे यांनी सांगितले. आजच्या काळात घरात घरपण राहिले काय, याचा विचार करण्याची वेळ आली असल्याचे पद्मभूषण माजीन्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी यांनी सांगितले. 'ती आणि मी' हे आत्मनिवेदनातले नैवेद्य आहे. पती व पत्नी हे वेणीच्या दोन पदराप्रमाणे स्वतंत्र व स्वायत्त असतात. यांचे विलीनीकरण नसते तर ते सहजीवन असते. या सहजीवनातूनच पति-पत्नीच्या पलीकडे असलेल्या नात्यांनाही आपलेपणा येतो. वनस्पती, प्राणी, नाती हे कौटुंबिक भावनेचे प्रतीक म्हणून भवरलाल जैन यांच्या घराकडे पाहता येईल. हे घर केवळ त्यांच्या कुटुंबापुरतेच मर्यादित राहिले नसून, 'ती आणि मी'च्या निमित्ताने ते आता वैश्विक होते आहे. !

**"हे पुस्तक केवळ आत्मकथनापुरते मर्यादित नसून, भारतीय सांस्कृतिक मूल्याचे ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून मोलाचे असून, भवरलाल जैन यांनी अत्यंत कुशलतेने एकत्र कुटुंबपद्धतीचे व स्वतःच्या धर्मपत्नीचे योगदान अधोरेखित केले आहे. हे लिखाण स्त्रीमुक्ती चळवळीलाही समाधान देणारे आहे."**

**डॉ. विजया राजाध्यक्ष**

## पद्मश्री डॉ. भवरलालजी जैन लिखित 'ती आणि मी' पुस्तकाला लाभलेली ज्येष्ठ साहित्यिक डॉ. भालचंद्र नेमाडे यांची प्रस्तावना



**"दोन हजार वर्षांहून प्राचीन तसेच अखंड अशा परंपरेत कितीतरी विधायक आणि विघातक घटक काम करीत असतात. या बहुविध आणि विक्षिप्त व्यक्तिमत्त्वांच्या केंद्रस्थानी तेव्हापासून कोणीतरी कांताबाईंसारख्या स्त्रियाच आहेत, असे दिसते. हे कुटुंब मोडूच नये, याची चिंता या गृहिणीच वाहत असतात. ५० वर्षांच्या परिप्रेक्ष्यातून हे एखाद्या गृहिणीचे केंद्रस्थानात राहणे किती लोभस असते, हे रा. भवरलाल यांनी काव्यात्म वृत्तीने वर्णन केले आहे. आपली जोडीदारीण गेल्याची वेदना त्यांनी संयत कथनाने, कुठेही भावनावशता टाळून केली आहे."**

**आमचे** साहित्यिक मित्र रा. भवरलाल जैन यांनी लिहिलेले प्रस्तुत आत्मचरित्र अनेक पातळ्यांवरून अनुभवता येईल, इतके ते विचारगर्भ आहे. तथापि, त्याचे मध्यवर्ती आशयसूत्र सर्वांच्या काळजाला भिडणारे ठरेल. ते म्हणजे आपल्या प्रिय सहचारिणी कांताबाई यांच्या वियोगाचा आघात त्यांनी कसा सोसला?

त्यांनी कांताबाईंच्या पहिल्या भेटीपासून घडत गेलेला काळ पुन्हा जणू जगून त्याला जिवंतपणे आपल्यासमोर उभे केले. स्वतः रा. भवरलाल चार–पाच वेळा मृत्यूच्या भेटीला निधडेपणे जाऊन आले आहेत. मृत्यू हे एक भीतिदायक, थंडगार करणारे सत्य आहे. या विधिघटनेसमोर माणूस दुःखाने दुभंगून जातो. विरक्तीची छाया पसरते. या दुःखाला उत्तर सापडत नाही. माणसाच्या या असहायतेमुळे धर्म निर्माण झाले, असे मानले जाते. याच एका दुःखाला सांत्वन नसते, यामुळे गेलेल्या माणसाची भरपाई होत नाही. जैन आणि बौद्ध हे निरीश्वरवादी धर्म. इतर धर्मांपेक्षा जीवनमरणाचा संबंध त्यातल्या त्यात विवेकाने लावतात. बहुधा या प्रभावामुळे रा. भवरलाल यांनी धार्मिक अंधश्रद्धांचा कुठेही आसरा न घेता आपले दुःख पेललेले दिसते. कविकुलगुरू मिर्ज़ा ग़ालिबने म्हटल्याप्रमाणे कुठलाही धर्म म्हणजे माणसाने असहायतेपोटी निर्माण केलेले बनावट आसरे असतात :

दैर–ओ–हरम आइना–ए–तकरारे तमन्ना

वामांदगि–ए–शौक तराशे है पनाहे

अशा प्रसंगी आत्मशोध हाच आधुनिक व्यक्तीला अधिक चिरंतन आसरा देणारा ठरतो. 'ती आणि मी' हा रा. भवरलाल यांचा असा प्रामाणिक आत्मशोध आहे. या त्यांच्या आत्मशोधातून आज आपल्याला संभ्रमित करणारे अनेक प्रश्न ऐरणीवर आले आहेत: हिंदू (भारतीय या अर्थी) विवाहसंस्थेचे स्वरूप, हिंदू कुटुंबसंस्थेच्या स्थैर्याचा या विवाहसंस्थेशी असलेला सेंद्रिय संबंध, हिंदू विवाह संस्था आणि स्त्रीचे स्थान, स्त्रीस्वातंत्र्य वगैरे व्यक्तिवादी मूल्ये; परंतु त्यांना लागलेला सर्वाधिक महत्त्वाचा शोध म्हणजे, भवरलाल जैन हे कोण होते, असं विचारल्यावर उत्तर आले, कांताबाईंचे ते पती होते. हिंदू विवाहसंस्थेचा हा मध्यवर्ती घटक आहे.

'स्मृतिचित्रे' (१९३४) हे लक्ष्मीबाई टिळक या साध्या गृहिणीने लिहिलेले आत्मचरित्र मराठीत सर्व थरांतल्या वाचकांनी गौरवलेला अक्षरग्रंथ आहे, हे निरनिराळ्या सर्वेक्षणांमधून सिद्ध झाले आहे. हे आत्मचरित्र म्हटले जाते; परंतु ते नकळत लक्ष्मीबाईंचे पती रेव्हरंड नारायण वामन टिळक या कवीचे चरित्रही झाले आहे. ङ्गती आणि मीफ हे रा. भवरलाल यांचे आत्मचरित्रही असेच कांताबाई जैन यांचे चरित्र झाले आहे. आपल्या विवाहसंस्थेचे हे अगम्य असे रुप आहे, कि पती–पत्नी हे उशिरा विवाहोत्तर एकत्र येऊनही किती एकमेकांशी एकरुप होऊ शकतात. आत्मचरीत्राच्या सीमा ओलांडून चरित्रात जाणाऱ्या कथनांचे रहस्य या हिंदू विवाहसंस्थेतल्या संस्कारांशी निगडित आहे. पतिव्रतांचेआदर्श आपल्या संस्कृतीत अनेक आहेत; परंतु हिंदू विवाहपद्धत एकपत्नीव्रती पुरुषांमुळेसुद्धा भक्कम झाली आहे, हे फारसे ध्यानात घेतले जात नाही. दक्षिण अमेरिकेत अचानक गायब होणारे नवरे (disappering husbands) हा एक सामाजिक प्रश्न आहे. इंग्लंड–अमेरिकेत घटस्फोटित स्त्री–

पुरुषांची संख्या निम्म्यावर जाऊ पाहते आहे. एकपालकी कुटुंबे प्रचंड संख्येने अमेरिकेत वाढत आहेत. हिंदू विवाहसंस्थेचे हे गौरवशाली स्वरूप समजले जाते, की तिच्यामुळे या अफाट देशातल्या हजारो जनसमूहांचे सामाजिक स्थैर्य शतकानुशतके अबाधित राहिले. याचा संबंध राष्ट्रीय आणि एकूण मानवी समाजाच्या मानसिक आरोग्याशी जोडला गेला पाहिजे. युनोने दरडोई राष्ट्रीय उत्पन्नाबरोबरच दरडोई कौटुंबिक समाधान हा ही एक प्रगतीचा पॅरामीटर ठरवला पाहिजे.

रा. भवरलाल यांनी सर्व कुटुंबीयांशी विचारविनिमयाने पारंपरिक पद्धतीने जुळवलेला विवाह करण्याचे ठरवले, त्या वेळी व्यक्तिवादातून भोगवादी प्रवृत्ती नवविवाहितांना कशा अधोगतीकडे नेतात, हा त्यांनी वसाहतीकरणातून आलेल्या व्यक्तिवादाचा उत्तम प्रतिवाद केला आहे:

व्यक्तिस्वातंत्र्याच्या असल्या खुळ्या कल्पना केवळ पाश्चात्त्य संस्कृतीच्या अंधानुकरणातून आल्या आहेत. भारतीय संस्कृतीची काहीच जाण नसलेले, अर्धेकच्चे ऐकीव घेऊन पळणारे भौतिकतेच्या भूलभुलैयात गोंधळलेल्या विचारांनी चळतात–बिथरतात. दोघांच्या सहवासाला इतर प्राण्यांसारख्या प्रासंगिक 'भुकेचे' स्वरूप येते. या भुकेतून सर्वात वाईट बाब आकाराला येते, ती म्हणजे एकाकीपणा. (पृ.२४–२५)

आधुनिक काळात आपण कोणीही अर्थातच व्यक्तिस्वातंत्र्याच्या विरुद्ध असू नये; परंतु या स्वातंत्र्याची परिमापके निश्चित नसल्याचे दुष्परिणाम आपण गेल्या दोन शतकात वसाहतीकाळात अनुभवले आहेत. आपल्या परंपरेतल्या नैसर्गिक न्यायाने उत्क्रांत होत आलेल्या कितीतरी देशी व्यवस्था परक्या संस्कृतीच्या अव्याहत दडपणाखाली मोडीस निघाल्या. अनेक सहस्त्रकांपासून विकसित होत आलेल्या आपल्या ग्रामसंस्था इंग्रजी वसाहतवादाने पायाखालीच पोखरून काढल्या. सत्तेचे आदर्श असे विकेंद्रीकरण आणि गणतंत्राचा आदर्श आविष्कार असलेली आपली ग्रामव्यवस्था दिल्ली–मुंबईशी जोडून त्यांचे सत्त्व इतके नष्ट करण्यात आले, की आता पंचायत राजच्या घोषणा करून फारसा उपयोग होत नाही. दुसरा आघात संयुक्त कुटुंबावर झाला. आपली विवाहपद्धती हा विडंबनाचा विषय झाला. यात साहित्यिकांचा मोठा वाटा आहे. आपल्या देशी आर्थिक–सामाजिक संसाधनांचे भान न ठेवता रोमँटिक पद्धतीचा व्यक्तिवाद बोकाळला.

रा. भवरलाल यांच्या विवाहपूर्व आणि विवाहोत्तर आलेखात हिंदू संयुक्त कुटुंबातल्या समूहमानसाची मानवतावादी बाजू फार प्रभावीपणे मांडली आहे. आपले राष्ट्रीय महाकाव्य महाभारत हे कुरू कुटुंबावरचे समग्रलक्ष्यी भाष्य तर हिंदू संयुक्त कुटुंबाच्या नैतिकतेवरची अद्वितीय मानवी निर्मिती समजली जाते. या तेव्हापासूनच्या दोन हजार वर्षांहून प्राचीन तसेच अखंड अशा परंपरेत कितीतरी विधायक आणि विघातक घटक काम करीत असतात. या बहुविध आणि विक्षिप्त व्यक्तिमत्त्वांच्या केंद्रस्थानी तेव्हापासून कोणीतरी कांताबाईंसारख्या स्त्रियाच आहेत, असे दिसते. हे कुटुंब मोडू नये, याची चिंता या गृहिणीच वाहत असतात. ५० वर्षांच्या परिप्रेक्ष्यातून हे एखाद्या गृहिणीचे केंद्रस्थानात राहणे किती लोभस असते, हे रा. भवरलाल यांनी काव्यात्म वृत्तीने वर्णन केले आहे. आपली जोडीदारीण गेल्याची वेदना त्यांनी संयत कथनाने, कुठेही भावनावशता टाळून केली आहे.

कवी जेव्हा असा आघात उपमा–उत्प्रेक्षा–रूपकांमधून सांगतात, तेव्हा विशुद्ध कवितेची शैली कसोटीला लागते. उदाहरणार्थ, जॉन डन या सतराव्या शतकातल्या इंग्रजी कवीने आपल्या बायकोच्या अबोल, स्थिर, शांत साहचर्याचे उदाहरण म्हणून भूमितीच्या पेन्सिलकंपासाची उपमा वापरली. तो म्हणतो, 'हे कर्तृत्वाचे वर्तुळ मी काढू शकलो, याचे कारण मी फिरत असलो तरी कंपासाच्या दुसऱ्या पायासारखी तू एके जागी स्थिर राहिल्यानेच ते शक्य झाले.' तुकारामानेही बायको गेल्यावर म्हटले की, ती गेली. आता विठ्ठला, मी तुझ्या सेवेला पूर्णतः मुक्त झालो.

**"सामाजिक स्थैर्यासाठी लागणारे ताबूंचे ओझे स्त्रीवर्गावरच लादले गेले. ही सगळ्याच समाजातल्या कुटुंबसंस्थेची आणि पर्यायाने स्त्रीवर्गाची शोकान्तिका आहे. यावर लेखकाने मौलिक भाष्य केले आहे. सर्वच पुरुषांनी रा. भवरलाल यांची मातृधर्मी संवेदनशीलता जोपासल्याशिवाय या आर्थिक असंतुलनाची भरपाई होणे शक्य नाही."**

सर्वच पुरुषांना आपले कुटुंब स्थिर राहावे आणि आपण मात्र धडाडीने फिरते राहावे, असे आतून वाटत असते. खरे पाहता, कुटुंबसंस्थेचा पाया इतका प्रथमपासून तकलादू आहे, की तो केव्हाही ढासळू शकतो. हा सर्वत्र चिंतेचा विषय झाला आहे. त्यातून श्रमविभाजनाच्या आदिम काळापासूनच्या व्यवस्थेत पूर्वाश्मकाळातल्या शिकार आणि साठवणीपर्यंत समान मूल्य होते. पुढे कृषिसंस्कृतीनंतर व्यापारी अर्थशास्त्रात स्त्रियांचे कुटुंबाला स्थैर्य देण्याचे श्रम गणले गेले नाहीत. त्याला मूल्य न दिल्याने घरातल्या गृहिणींच्या श्रमाला मोलही राहिले नाही. त्याची दखल घेण्याचीही पद्धत नाहीशी झाली. वस्तुतः मुलाला जन्म देणे, याचेच मूल्य पुरुषाच्या व्यापारी कमाईपेक्षा कितीतरी पटींनी अधिक आहे. संगोपनाचेही मूल्य मानवी अर्थशास्त्रात नाही. यामुळे स्त्रीवादी विचारवंत स्त्रियांच्या घरातल्या कामाला वेठीचे काम – Cheap labour – म्हणून हिणवतात. मातृदेवता, गृहलक्ष्मी असे उदात्तीकरण करून स्त्रीचे शोषण करण्याची ही पितृसत्ताक पुरुषप्रधान रणनीती समजली जाते. उदबत्तीसारखी स्वतः जळून राख झाली, घरातल्या सगळ्यांना सुगंध देत – ही प्रतिमा सर्वमान्य झाली. या सर्व त्यागामागे कुटुंबसंस्थेचे संस्कार आहेत. सामाजिक स्थैर्यासाठी लागणारे ताबूंचे ओझे स्त्रीवर्गावरच लादले गेले. ही सगळ्याच समाजातल्या कुटुंबसंस्थेची आणि पर्यायाने स्त्रीवर्गाची शोकान्तिका आहे. यावर लेखकाने मौलिक भाष्य केले आहे. सर्वच पुरुषांनी रा. भवरलाल यांची मातृधर्मी संवेदनशीलता जोपासल्याशिवाय या आर्थिक असंतुलनाची भरपाई होणे शक्य नाही.

या पुस्तकात जागोजागी संयुक्त कुटुंबाला जाणाऱ्या लहान–मोठ्या तड्यांचे उल्लेख येतात. सुदैवाने या कुटुंबाला इतर बहुसंख्य कुटुंबांत कलह पेरणाऱ्या आर्थिक टंचाईचा स्पर्श नाही; परंतु या अनेक जणांच्या कुटुंबातले मानसिक संतुलन हरघडी सांभाळल्याची

वास्तव उदाहरणे ठिकठिकाणी येतात. यात कांताबाईंनी उपजतबुद्धीने सांभाळून घेतलेली उभी, आडवी आणि बाजूची सर्व नाती, सर्व वयोगटांमधली माणसे, मुले, ज्येष्ठ सभासद, आसऱ्याला आलेले, परके, पाहुणे – असे अनेकविध संबंधांचे त्यांच्याभोवतीचे भावनिक जाळे पाहिल्यानंतर हिंदू गृहिणीला कराव्या लागणाऱ्या भूमिकांची जटिल बहुविधता लक्षात येते. इतक्या पातळ्यांवर आणि बदलत्या कोनांमध्ये कार्यरत असलेले हे व्यक्तिमत्त्व मोठ्या तितीक्षेची परंपरा चालवताना दिसते. हे निसर्गतःच घडणाऱ्या त्यागाचे धडे खोलवरच्या संस्कारांशिवाय शक्य नसतात. खरेतर आपण ज्या रोजच्या व्यवहारांना क्षुद्र समजतो, ती मोठी मूल्ये आहेत – काटकसर, साधेपणा, सहनशीलता, आतिथ्य, नम्रता ही उद्याच्या जगाची मूल्ये असून, जगातल्या तथाकथित प्रगत संस्कृतींनाही शिकावी लागणार आहेत, असे वारे हल्ली सगळीकडून वाहते आहे.

वस्तुतः रा. भवरलाल जैन हे आपल्या देशातले एक आघाडीचे उद्योजक असून, जैन कुटुंबाची सांस्कृतिक कर्तबगारीही कमी नाही. नऊ वर्षांपूर्वी त्यांनी मांडलेला सज्जनशक्तीचा विचार आपल्या लोकशाहीच्या मुळापासून विचार करायला लावणारा होता. त्यांचे व्यक्तिमत्त्वही अनेक पैलूंचे आहे. केवळ मित्र म्हणून मी त्यांची स्तुती करणे येथे टाळतो. तथापि, अशा कर्तृत्वशाली व्यक्तिमत्त्वामागे कोणती ऊर्जा क्रियाशील असते, याचे आकलन होण्यासाठी 'ती आणि मी' हे आत्मचरित्र वाचकांना उद्‌बोधक ठरेल.

गौरवशाली राजस्थानी संस्कृती राजपूत वीरांगना कार दुर्गाप्रसाद आसाराम तिवारी या जळगावच्याच लेखकाने स्वातंत्र्यपूर्व काळात लोकप्रिय केली होती. शिवाजीच्या काळापासून महाराष्ट्रात आर्थिक संपन्नता वाढवण्यात या मारवाडी संस्कृतीचे महाराष्ट्राला मोठे योगदान आहे. कोणत्याही समृद्ध प्राचीन परंपरेत नव्या पिढीची नवी मते सामावून घेण्याची क्षमता आणि औदार्य असतेच, हे रा. भवरलाल यांनी सुरुवातीलाच वधूपरीक्षेच्या निमित्ताने आपल्या परंपरावादी कुटुंबीयांशी झालेल्या संघर्षातून आणि नंतरही वेळोवेळी व्यक्त केले आहे.

रा. भवरलाल यांनी आपले स्वतःचे असे स्मरणतंत्र विकसित केले आहे. एखाद्या कुशल साहित्यिकाच्या शैलीप्रमाणे कांताबाईंचा जीवनप्रवास निवडक प्रसंगांमधून त्यांनी रेखाटला आहे. मुलगी पाहताना भारतीय नवरदेव किती परिमापके वापरतो, हे त्यांनी सुरुवातीला कांताबाईंशी केलेल्या चतुर संवादातून व्यक्त केले आहे. तेव्हापासून कांताबाईंची छाया निवेदनातून अधिकाधिक गडद होत जाते. त्यांच्या अंगी पत्नी, गृहिणी, संयुक्त कुटुंबातले अखंड चाललेले ताणतणाव सैल करण्याचे शहाणपण आणि मनाचा मोठेपणा आहे. खानदेशातल्या एका लहानशा खेड्यात नेकीने जगणाऱ्या कष्टाळू मारवाडी कुटुंबाची पारंपरिक घडी विस्कटू न देता रा. भवरलाल आणि कांताबाई या नव्या पिढीच्या जोडप्याने या संपूर्ण परिवाराला यशाच्या उत्तुंग शिखरावर नेले – हे आपल्या एकूण देशाच्या गतिमानतेचे मानचित्र ठरेल, असे तेजस्वी उदाहरण आहे. पण या प्रगतीसाठी या दोघांनाही किती तारेवरच्या कसरती आयुष्यभर कराव्या लागल्या असतील, याचे धावते, चटका लावणारे कथन 'ती आणि मी' मध्ये वाचकांना दिसेल.

**"खानदेशातल्या एका लहानशा खेड्यात नेकीने जगणाऱ्या कष्टाळू मारवाडी कुटुंबाची पारंपरिक घडी विस्कटू न देता रा. भवरलाल आणि कांताबाई या नव्या पिढीच्या जोडप्याने या संपूर्ण परिवाराला यशाच्या उत्तुंग शिखरावर नेले – हे आपल्या एकूण देशाच्या गतिमानतेचे मानचित्र ठरेल, असे तेजस्वी उदाहरण आहे. पण या प्रगतीसाठी या दोघांनाही किती तारेवरच्या कसरती आयुष्यभर कराव्या लागल्या असतील, याचे धावते, चटका लावणारे कथन 'ती आणि मी' मध्ये वाचकांना दिसेल."**

अनेक प्रसंगांमधून हा प्रवास मांडताना रा. भवरलाल आत्मचरित्राच्या सीमा ओलांडून चरित्राच्या क्षेत्रात लीलया जातात. रा. भवरलाल यांचा पिंड साहित्यिकाचा आहे, याचा उत्कट प्रत्यय त्यांनी योजलेल्या अशा अनेक क्लृप्त्यांमुळे येतो. उदाहरणार्थ, आपल्या सर्वच जाती-जमातींमध्ये लग्न ही खासगी बाब राहतच नाही. तो सगळ्या गणगोताचा चिंतेचा विषय बनतो. अनेक दूरचे-जवळचे आप्तेष्ट स्थळे पाहतात, माहिती काढतात, सर्वांची सल्लामसलत सतत चालू असते. युरोपात हा केवळ दोन व्यक्तींचा मतलब समजला जातो. आपल्याकडे वधू आणि वर दोघांच्या खटल्यांतल्या अनेकांना हा प्रायव्हेट संबंध वाटत नाही. या वेळी लेखकाचे अत्यंत सूचक विनोदी वाक्य आहे, ती उत्तम सांस्कृतिक टिप्पणी ठरेल. ते म्हणतात, "आपल्याकडे एकदाच लग्न करतात. त्यामुळे सगळ्या गोष्टी नीटच पाहाव्या लागतात. अनेकदा लग्न करणाऱ्यांना हा प्रश्न पडत नाही."

रा. भवरलाल उद्योजक झाले नसते तर साहित्यिक झाले असते, असे स्वतःबद्दल म्हणतात, ते अर्धसत्यच म्हणावे लागेल; कारण आता ते दोन्ही आहेत. मराठीत उद्योजक साहित्यिकांची संख्या वाढावी, अशी अपेक्षा या पुस्तकाच्या निमित्ताने व्यक्त करावीशी वाटते. मराठीत लिहिणे हे मराठीवर प्रेम व्यक्त करण्याची प्राथमिक कसोटी आहे. उद्योजक म्हणून त्यांनी खानदेशासारख्या शेतीप्रधान आणि उद्योग-निरक्षर भागात क्रांती केली, शून्यातून मोठे औद्योगिक साम्राज्य उभारले. याचा इकडे हिमाचल प्रदेशातसुद्धा उल्लेख होत असतो, हे इकडे गेली दोन वर्षे मी ऐकतो आहे. या सर्व विस्तारशीलतेमध्ये कांताबाई यांचा सिंहाचा वाटा आहे. त्यांच्या समृद्ध संस्कारांमधून घडलेले त्यांचे सुपुत्र रा. अशोक, अनिल, अजित आणि अतुल या चौघांचेही पाळणे या चरित्रगृहात हाललेले आहेत. जैन कुटुंब विकासशील, प्रयोगशील, वर्धिष्णु आणि सामाजिक बांधिलकी पाळणारे आहे. कोणालाही अभिमान वाटेल असा निर्मळ शुद्ध वारसा या कुटुंबाला लाभलेला आहे. भगवान महावीरांच्या एका प्राकृत चरित्रात दोन गोष्टी सांभाळायचा आग्रह केला आहेः कुल आणि शील. भवरलाल आणि कांताबाई हे कुल आणि शील या दोन ऊर्जांचे स्रोत म्हणून पुढील पिढ्यांना प्रेरक ठरतील, असा मला विश्वास वाटतो.

# 'ती आणि मी' प्रकाशन सोहळ्यातील मान्यवरांचे विचारमंथन

## ती आणि मीचे प्रकाशक तथा मॅजेस्टिक प्रकाशनचे संचालक अशोक कोठावळे यांचे प्रास्तविक



**"भवरलाल जैन यांच्या आत्मकथनाचं नावच मुळी 'ती आणि मी' म्हणजे नावापासूनच 'ती' ला त्यांनी मध्यवर्ती ठेवले आहे, 'ती'ला पहिले स्थान दिले आहे. या पुस्तकाच्या प्रकाशनानंतर त्याचे मुखपृष्ठ ज्या वेळी आपण बघाल, त्या वेळी आपल्या लक्षात येईल, की त्या मुखपृष्ठावरसुद्धा प्रथमदर्शनी तुम्हाला तीच दिसते आणि मुखपृष्ठ उघडल्यानंतर 'मी'चे दर्शन होते."**

**'ती आणि मी'** हे आत्मकथनात्मक पुस्तक माझ्याकडे प्रकाशनासाठी आलं. ते डॉ. जब्बार पटेल यांच्यामुळे. एकदा सहज भेटीत ते मला म्हणाले, की "भवरलाल जैन यांनी 'ती आणि मी'या नावाचे पुस्तक लिहिले आहे, ते तू वाचून बघ, मला ते आवडले आहे. मी त्यांना तुझ्याकडे पाठवायला सांगतो." आणि त्याप्रमाणे हे पुस्तक माझ्याकडे आले.

आपल्याकडे पती–पत्नीच्या सहजीवनाचा आलेख रेखाटणारी स्त्रियांच्या आत्मचरित्रांची बरीच मोठी परंपरा आहे. त्यातील बऱ्याच आत्मचरित्रांच्या केंद्रस्थानी पती आणि त्यांचे कर्तृत्व असते; परंतु आपल्याकडे पुरुषांनी लिहिलेल्या आत्मचरित्रात मात्र 'स्व' कर्तृत्वाला किंवा स्वत:च्या जडणघडणीला खूप महत्त्वाचे स्थान असते. पत्नीचा उल्लेख अभावानेच आढळतो किंवा त्याला अगदी कमी स्थान असते. याला कदाचित आपल्याकडील पुरुषप्रधान संस्कृती कारणीभूत असते.

भवरलाल जैन यांच्या आत्मकथनाचं नावच मुळी 'ती आणि मी' म्हणजे नावापासूनच 'ती' ला त्यांनी मध्यवर्ती ठेवले आहे, 'ती'ला पहिले स्थान दिले आहे. या पुस्तकाच्या प्रकाशनानंतर त्याचे मुखपृष्ठ ज्या वेळी आपण बघाल, त्या वेळी आपल्या लक्षात येईल, की त्या मुखपृष्ठावरसुद्धा प्रथमदर्शनी तुम्हाला तीच दिसते आणि मुखपृष्ठ उघडल्यानंतर 'मी'चे दर्शन होते. भवरलाल जैन यांचं हे आत्मकथन वेगळं वाटलं ते केवळ पत्नीविषयी लिहिलं म्हणून नव्हे; तर आपल्या यशात बरंचसं श्रेय त्यांनी आपल्या पत्नीला दिलं आहे. "मी कमावलं, मी कष्ट केलं, माझ्यामुळं हे घडलं" अशी 'मी'ची भाषा इथे आढळत नाही, तर पत्नीच्या दूरदर्शीपणाला, सहकार्याला, कष्टांना त्यांनी खुल्या मनाने दाद दिली आहे.

आपल्या जैन उद्योग साम्राज्याच्या विस्ताराचे निर्विवाद श्रेय त्यांनी आपल्या पत्नीला दिले आहे. गृहिणी, सखी, सचिव ही भूमिका त्यांच्या आयुष्यात कांताबाईंनी किती समरस होऊन रंगविली, त्याचा प्रत्यय हे पुस्तक वाचताना येत राहतो. अतिशय हळुवार शैलीत त्यांनी आपल्या पत्नीविषयी लिहिलेले आत्मकथन साध्या, सरळ भाषेमुळे वाचकांची पकड घेते. खऱ्या अर्थाने पत्नीला अर्धांगिनीचा दर्जा कसा देता येतो हेही या पुस्तकावरून लक्षात येईल. पत्नीचा आत्मसन्मान कसा राखावा किंवा पत्नीच्या मताची कदर राखत घेतलेल्या निर्णयामुळे यशाकडे झालेल्या वाटलीचालीचे दर्शन या ठिकाणी घडते.

'ती आणि मी' पुस्तकाच्या निमित्ताने आपण एका भावपूर्ण नात्यातील साक्षी होतो. पुस्तक वाचल्यानंतर तुम्ही माझ्या या विधानाशी निश्चितच सहमत व्हाल.

• • • • •

## ती आणि मी पुस्तक प्रकाशन सोहळ्यात पद्मश्री कविवर्य ना. धों. महानोर यांचे व्यक्त झालेले विचार



**"अजिंठ्याच्या पायथ्याशी आम्ही राहतो. चार–पाच किलोमीटर अंतरावर अजिंठा डोंगरात कोरलेल्या जगविख्यात अजिंठा लेणीच्या कलावंतांची सावली आणि प्रेम आमच्यावर आहे. भाऊंनी एवढे काम केले नसते,**

**एवढ्या एकत्रित कुटुंबामध्ये चिरेबंदीवाडा जो आहे तो जगत असताना तेव्हापासून तर आतापर्यंत हे सगळं झालंच नसतं...**

**फक्त एक आहे, की भाऊंच्या बरोबर सुगरणीची लहानशी चोच घेऊन ती घरटे बनवते आणि घर सांभाळते आणि पिलांना मोठे करते, ती सुगरण जर कांताबाई नसती तर हे झालेच नसते!"**

**'ती आणि मी'** पुस्तक प्रकाशन प्रसंगी मला मुख्यतः केशवराव कोठावळेंची आठवण येते. अशा प्रकाशन संस्थेच्या वतीने हे पुस्तक प्रकाशित होतेय, याचा जास्त आनंद होत आहे. ही आनंदयात्रा या पुस्तकाच्या निमित्ताने होत आहे. मी बोलायचे नाही, असे अशोकभाऊलाही सांगितले. जो भारावलेपणा आहे ठीक आहे. आपलं वय एवढं झालेलं असतं. अजूनसुद्धा या पुस्तकाच्या निमित्ताने बाई या वेळेला माझ्या डोळ्यांसमोर आहेत.

भाऊंचा आता परिचय करून दिला. मी त्यांचा मित्र आहे. लहान भाऊ आहे. त्यांच्या माझ्या गावाचे अंतर फक्त दोन किलोमीटर म्हणजे दीड मैलाचे आहे. तसे एका गावातले आम्ही. त्यांची आमची ओळख वडिलोपार्जित अशी आहे. अत्यल्प साध्या अशा गरिबीत ते होते. मीही होतो. कष्ट करण्याची तयारी असेल, जिद्द असेल आणि एकलव्य साधना ही साने गुरुजींची गोष्ट माहिती असेल तर माणूस काय वाटेल ते राखेतूनसुद्धा स्वर्ग निर्माण करू शकतो हे दाखविणारे भाऊ आहेत. (प्रचंड टाळ्या...) त्यांचं कर्तृत्व आणि बाकीच्या गोष्टी आहेतच.

अजिंठ्याच्या पायथ्याशी आम्ही राहतो. चार–पाच किलोमीटर अंतरावर अजिंठा डोंगरात कोरलेल्या जगविख्यात अजिंठा लेणीच्या कलावंतांची सावली आणि प्रेम आमच्यावर आहे. भाऊंनी एवढे काम केले नसते. एवढ्या एकत्रित कुटुंबामध्ये चिरेबंदीवाडा जो आहे तो जगत असताना तेव्हापासून तर आतापर्यंत हे सगळं झालंच नसतं. फक्त एक आहे, की भाऊंच्या बरोबर सुगरणीची लहानशी चोच घेऊन ती घरटे बनवते आणि घर सांभाळते आणि पिलांना मोठे करते, ती सुगरण जर कांताबाई नसती तर हे झालेच नसते! (टाळ्या) काही गोष्टी अशा होत्या ज्यात तुम्ही रॉकेल विकायला निघाले, डबे करायला निघाले पैसा पैसा पाहता सात हजारचे दहा हजार कसे होईल, कुटुंबाला तर पंचवीस हजार लागतात. इथपासून तर सबंध फरफट आयुष्याची जी चालत असताना हा माणूस उभा राहिलाय. सगळं मी पाहिलेलं आहे आणि सावलीपेक्षा उन्हाचे दिवस खूप पाहिलेले आहेत. त्या वेळेला चूल पेटवलेली असताना जाळ लवकर व्हावा म्हणून त्या फुंकनीतून चूल पेटवताना, तो जाळ निर्माण होत असताना अन्नाचा घास करताना, आई गौराई पीठ दळताना त्याची भाकरी तयार करून सगळ्या घरादाराला काके–मामे चुलते अशा सगळ्या घरादाराला काके–मामे–चुलते आणि वडिलोपार्जित सगळी मोठी माणसं जपताना बाई या तशा तेव्हा वयानं लहान होत्या.

काके–पुतणे सगळे असताना अशा वेळी घर सांभाळणे फार कठीण होत असते. त्या वेळी मारवाडी समाजात कर्नाटकातून एक बाई ग्रॅज्युएट होते. जैन समाजात फार तर मॅट्रिकपर्यंत कुठेतरी सापडायचे; कधीतर तेही नाही. अशा अवस्थेत एक सुशिक्षित मुलगी तिथून इथे येते आणि सबंध कुटुंबाच्या घराचे राखण करीत त्यांना मोठे करणे, त्यांना अन्नाचा घास चिल्लीपिल्लीपाखरासारखे भरवणे, सबंध कुटुंब चालवणे, याची जबाबदारी स्वीकारते. कुटुंबप्रमुख म्हणून कांताबाई उभ्या राहिल्या आणि त्यांनी सगळ सोसलं. चूल फुकताना तो अंगार, तो धूर आणि धुराड्यातून जळणार सगळं काही मी पाहिलेले आहे. या गोष्टी बाकीच्या सांगण्याचे काही कारण नाही. त्याचा उल्लेख पुस्तकामध्ये कुठेतरी आलेलाच आहे.

भाऊंनी स्वतःचे नाही केले पण १९८४ नंतर विघटन झाल्यानंतर प्रत्येकाच्या मागे उभे राहण्याचे काम केले. कांताबाईंने तेवढेच काम केले आणि म्हणून तर आज त्यांच्या इतका आनंद घेणारा दुसरा कोणताही माणूस मी पाहिलेला नाही. एकत्र कुटुंबामध्ये चांगले खूप असते. मी स्वतः एकत्र कुटुंबात वाढलेलो आहे. भाऊंच्या साक्षीने सगळे त्यांच्याचसारखे माझेही कुटुंब वाढलेले. मी जेव्हा पाहतो, की तडा जिथे जातो आणि विद्राह होतो तो कोणत्या थराला जातो? त्या वेळेला सगळे जगणे सांगणे बोलणे, अन्न खाणेसुद्धा मुश्किल होते.

कवितेत असंच असतं ना... एक सहा ओळी झाल्या, अंतर तुटले आणि या मध्ये जी कविता असते ना ती रसिकांनी समजून घ्यायची असते. ती ग्रेट कविता असते. भाऊंना कुठे तोडावे आणि कुठे जोडावे, हे चांगले कळते.

**"शेवटपर्यंत दुःखात उभे राहणारे जे असतात त्याच्यातली कांताबाई एक आहे. तसे माझ्यासारख्या शेकडो-हजारो माणसांना आधार देणारं हे कुटुंब आणि विशेषतः भाऊ तर आहेच; पण त्यांच्यासोबत कांताबाई होत्या."**

कारखानदार खूप आहेत हो! टाटा, बिर्लांपासून तर भवरलालजींपर्यंत. भाऊंचा पिंड शेतकऱ्याचा आहे, म्हणून त्यांचा माझा स्नेह अधिक राहिला. दोघे काम करीत गेलो. नवीन जे-जे काही असेल वॉटरशेड, झाड, फळझाड प्रक्रिया अशी कामे केली. जिथे सिमेंट नाही सोने मिळेल; पण सिमेंट मिळत नाही, अशा नव्वदच्या काळात एका रात्रीमधून दहा एकर, पन्नास एकर, दोनशे एकर भिजवणारी जी हरितक्रांती झाली ती पीव्हीसी पाईपामुळेच झाली. त्याचे जनक अनेक असतील; पण खरा जनक भवरलालजी जैन आहेत. (टाळ्या)

या तंत्रज्ञानामुळे भरड टेकड्यावर पाषाणातून पाझर निर्माण करून कर्नाटकापासून तर बाकीच्या ठिकाणी जिथे काहीच होत नव्हते तिथे माळरानावर हिरवाई साकार झाली. शेतीमधून पळून जावे आणि शेतीइतके वाईट काहीच नाही, असे जेव्हा महाराष्ट्रामध्ये वातावरण आहे त्या वेळेला शेतीशिवाय दुसरा पर्याय नाही, असे सांगणारे दोन वेडे आहेत त्यातला एक भाऊ आणि दुसरा मी आहे. ही गोष्ट आहे खरी, की ओंजळभर पाणी पाहिजे आणि ते नवीन तंत्रज्ञानाच्या पद्धतीने दिले पाहिजे. तीन एकरवाला शेतकरी हा नक्कीच उभा राहू शकतो हे सांगण्याचे काम ज्यांनी केले ते भवरलाल जैन आहेत. ही गोष्ट जी आहे ती या पुस्तकात फार कमी आलेली आहे. कारण या पुस्तकाचा केंद्रबिंदू आहे 'ती आणि मी'.

जैन उद्योगसमूह ८४ पासून तर ९४ पर्यंत मोठा झाला. नुसता मोठा नाही. झाला अपार कष्टाने, न जेवता न भाकर खाता वाट्टेल ते कष्ट घेऊन त्यातून मोठा झाला; परंतु ९४ नंतर चढ उतारामध्ये संपूर्ण उद्योग मोडकळीस आला. नुसता मोडकळीस आला नाही, फॅक्चर देऊनसुद्धा जमणार नाही, अशी परिस्थिती होती. त्या वेळेला भाऊंनी एक जाहिरात दिली होती. 'निष्पर्ण झाड आहे, त्याला एकच कोवळी फांदी! संपूर्ण महाराष्ट्रभर ही जाहिरात दिली. खात्रीपूर्वक सांगतो की माझ्या सभासदांना, माझ्या मित्रांना आणि बँकर्सला, या झाडाला पुन्हा पालवी फुटून दाखविलं आणि पुन्हा फुलं-फळं आणून दाखविलं. त्यावर विश्वास ठेवा' अशी जाहिरात होती.

बाईंना ही सगळी जाहिरात दाखविली. त्यानंतर बाई आजारी पडल्या, दुर्दैवाने नऊ-दहा वर्षांत त्या गेल्या. त्या नऊ-दहा वर्षांत बाई ज्या आजारामुळे गेल्या, त्याला कोणी काही करू शकत नाही, असा तो आजार होता. शेवटपर्यंत दुःखात उभे राहणारे जे असतात त्याच्यातली कांताबाई एक आहे. तसे माझ्यासारख्या शेकडो-हजारो माणसांना आधार देणारं हे कुटुंब आणि विशेषतः भाऊ तर आहेच; पण त्यांच्यासोबत कांताबाई होत्या. आठनऊ वर्ष बाईंना बोलता आले नाही. चालता आले नाही. सगळं आम्ही हावभावाने बोलायचो, लिहून द्यायचो, डोळ्यातून अश्रू यायचे. त्या गेल्या हे विधिलिखित होतं. म्हणजे अगदीच सांगायचं म्हणजे नुसते भाऊच नाही त्यांचं कुटुंब नाही, आम्ही सगळेच पोरके झाल्यासारखे झालो. हा विधिलिखित भाग असतो. भाऊंच्या घरामध्ये बाईंची आज एक खोली आहे. त्या घरामध्ये सगळ्या आमच्या लेकी-सुना फिरत असतात. बाईंच्या आठवणी असतात; परंतु बाई आणि भाऊ यांच्या आठवणी सदैव असणाऱ्या घरामध्ये मी आहे. त्या घरामध्ये बाई गेल्यानंतर सहज दलूभाऊ मला म्हटले, की आता याचे काय करायचे. बोलणे शक्य नव्हते; पण मी दोन-तीन ओळी ज्या मांडलेल्या होत्या त्या बाईंच्या खोलीत मोठ्या ठळक अक्षरात दिसतात. मी निघाले ईश्वराच्या देवळाशी तरीही भाऊ प्राण तुमच्या पावलांशी!



## ज्येष्ठ संपादक तथा खासदार भारतकुमार राऊत यांनी ती आणि मी पुस्तकावर व्यक्त केलेले मुक्तचिंतन



**"उद्योजकाला फक्त खोल खिसे असतात ऐवढेच आपल्याला कळते, परंतु त्याला एक खोल मन असते, हे आपल्याला कधी कळत नाही. भाऊंचे लिखाण वाचल्यानंतर, ही महान व्यक्ती केवळ उद्योजक नाही हे लक्षात येते. ते अपघाताने आणि खरं म्हणजे, त्यांच्या जन्माच्या प्रांतामुळे ते उद्योजक झाले असे म्हणावे लागेल. त्यांचे जे मन आहे हे कवीमन आहे, ते एक तत्त्ववेत्याचं मन आहे तसेच ते भावूकही आहेत. 'ती आणि मी' चे मायक्रो लेव्हलवर विश्लेषण करायचे झाले, तर ते भारतीय महिलेचे आत्मचरित्र आहे, जे एका पुरुषाने लिहिलेले आहे, हे आपण लक्षात घेणे आवश्यक आहे."**

आत्मकथन, आत्मवृत्त हे माझे वाचनाचे, आवडीचे विषय आहेत; परंतु तरीसुद्धा अनेकदा आत्मकथनं वाचण्यात आणि त्याच्याबद्दल बोलण्यात खूप मोठी रीस्क असते. याचे कारण अनेक आत्मकथने ही डायरीची पाने असतात. काही आत्मकथनात केवळ आत्मच असतो. मी.. मी.. मी आणि मी. एवढ्यापुरतेच ते आत्मकथन असते. आदर्श आत्मकथन म्हणजे तुमच्याबरोबर काळाचा प्रवास दाखवायचा असतो, मात्र असं फार क्वचित पाहायला मिळतं. त्याहून महत्त्वाची गोष्ट म्हणजे अनेक आत्मकथनं ही पारदर्शी नसतात. ती काही दडवू पाहतात आणि ती दडवण्याच्या प्रयत्नात खोटारडी ठरतात. त्यामुळे आत्मकथनाबद्दल जाहीररीत्या काही बोलायचे म्हणजे मला भीती वाटते.

काही व्यक्ती अशा असतात, की ज्यापुस्तक न वाचताही त्यापुस्तकावर बोलू शकतात. ही न वाचता बोलणारी काही माणसं खूप मुर्खतर काही खूप मोठी असतात. यापैकी दोन्ही मी नसल्यामुळे मी भाऊंकडून त्यांच्या कार्यालयातून एक पुस्तक मागविले आणि तुम्हाला सांगतो, की पुस्तक वाचल्यानंतर माझ्या डोळ्याला मला रुमाल लावावा लागला. खरे म्हणजे व्यवसायाने मी पत्रकार आहे. काही काळ संपादकसुद्धा राहिलेलो आहे. त्यामुळे, 'बरं आहे' ही आमच्या दृष्टीने सुपरमेटिव्ह डिग्री असते. परंतु मी आपल्याला सांगू इच्छितो, की हे आत्मकथन उत्कृष्ट आहे! (टाळ्या...) आणि त्यामुळे आपण सर्वांनी ते वाचणे गरजेचे आहे.

याचे मुखपृष्ठ मी पाहिलेले नव्हते. जेव्हा मी मुखपृष्ठ पाहिलं, तेव्हा हे मुखपृष्ठ हाच या आत्मकथनाचा आत्मा आहे, असं माझ्या लक्षात आलं आहे. 'ती'मधून 'मी' उगवतो आहे आणि जेव्हा 'ती'मधून जेव्हा 'मी' उगवतो तेव्हां 'तुपणाची झाली बोळवण एका जनार्दनी श्रीदत्त ध्यान' ही भावना पुढे येते. मीतुपणाची इथे बोळवण झाली आहे. ही दोघंही एकमेकांत मिसळून गेलेले आहेत. एकातून दुसरा उगवतो आहे.

उद्योजकाला फक्त खोल खिसे असतात, परंतु त्याला एक खोल मन असते, हे आपल्याला कधी कळत नाही. भाऊंचे लिखाण वाचल्यानंतर, ही महान व्यक्ती केवळ उद्योजक नाही, अपघाताने आणि खरं म्हणजे, त्यांच्या जन्माच्या प्रांतामुळे ते उद्योजक झाले असे म्हणावे लागेल. त्यांचे जे मन आहे हे कवीमन आहे, ते एक तत्त्ववेत्याचं मन आहे आणि तसेच ते भावूकही आहेत. कारण, जेव्हा ते वेगळं बोलायला लागतात, तेव्हा वेगवेगळ्या विषयांवर बोलतात. ज्ञानेश्वरी, गीतेपासून ते आध्यात्मापर्यंत ते बोलत राहतात.

आज या ठिकाणी कोठावळेंनी आणखी एक गोष्ट सांगितली, की अनेक आत्मकथनं जी महिलांनी लिहिली आहेत, ती त्यांच्या नवऱ्याविषयी लिहिली गेलेली आहेत. कारण, बाईचे आयुष्य हे नवऱ्याभोवती फिरत असते. अशी एक गोष्ट आहे म्हणजे असे, की अगदी विथ ऑल ड्यू रिस्पेक्ट.. मी सांगतो, की लक्ष्मीबाई टिळकांच्या स्मृतिचित्रेपासून, त्यांच्या सर्वांची आत्मवृत्ते ही 'ते आणि मी' अशी आहेत. त्यामुळे त्यांचे सगळे आयुष्य हे तिकडे घुटमळते आहे, असे वाटते. काहींनी आपल्या नवऱ्यांवर टीका करण्यासाठी म्हणूनसुद्धा आत्मवृत्त लिहिली. त्यांच्या टीकामध्येसुद्धा नवरा हीच गोष्ट सेंट्रल कॅरेक्टर होती. दिसायला टीका होती ती, खूप कौतुकही

झाले; परंतु नवरा हे सेंट्रल कॅरेक्टर, त्यातून स्वत:ची कथा जात राहिली.

'ती आणि मी' लिहिताना भाऊंनी लेखिकेची भूमिका घेतली असे मला वाटायला लागले. एका पुरुष लेखकाने स्त्री भूमिकेत जाऊन हे पुस्तक लिहिले आहे, असे मला सारखे वाटते आहे. त्यातली अनुभवांची तरलता आणि व्यक्त करण्याची जी सचोटी सर्व पुरुषामध्ये असतेच असे नाही. त्यातून व्यवसायामध्ये असलेल्या पुरुषामध्ये असणे अभावच आहे. त्यामुळे भाऊंनी स्वत:बद्दल लिहिताना त्यांनी 'ती आणि मी' असे जे लिहिले, त्यात त्यांनी 'ती'ला सेंट्रल कॅरेक्टर केले. त्याचे अनेक अनुभव येतात. आता ना. धों. महानोरांचा आणि बाईंचा स्वत:चा व्यक्तिगत परिचय असल्यामुळे त्यांनी अनेक गोष्टी सांगितल्या. त्या मी तुम्हाला आज सांगणार नाही; परंतु यामधून दिसणारी जी एक बाई आहे, या बाई खरच एक भारतीय महिला समाजाची प्रतिनिधी आहे. स्वत:ला विसरून कुटुंबासाठी झोकून देणारी. स्वत:चे अस्तित्त्व पुसून टाकून स्वत:चे सुविद्य शिक्षण सगळे बाजूला ठेवून माझा नवरा, माझा मुलगा, माझा समाज यांच्यासाठी म्हणून त्यांनी जे स्वत:ला वाहून घेतले, हे सर्व जे कथन आहे हे एका भारतीय महिलेचे कथन आहे. त्यामुळे ते भारतीय समाजाच्या दृष्टीने प्रातिनिधिक आहे, असे मला वाटते. त्यामुळे 'ती आणि मी'चे मायक्रो लेव्हलवर जर विश्लेषण करायचे झाले, तर ते भारतीय महिलेचे आत्मचरित्र आहे, जे एका पुरुषाने लिहिलेले आहे, हे आपण लक्षात घेणे आवश्यक आहे.

> **"भाऊंनी तर ठिबक योजना काढली; परंतु ही का काढली असेल, असा विचार करता माझ्या लक्षात आले, की त्यांच्या घरातच बाईंच्या रूपाने प्रेमाची आणि मायेची ठिबक योजना सतत वाहत होती."**

कांताबाईंबद्दल वाचताना माझ्या लक्षात आले आहे, की भाऊंनी तर ठिबक योजना काढली; परंतु ही का काढली असेल, असा विचार करता माझ्या लक्षात आले, की त्यांच्या घरातच बाईंच्या रूपाने प्रेमाची आणि मायेची ठिबक योजना सतत वाहत होती. (टाळ्या...) आणि ही अशी ठिबक योजना त्यांच्या घरातच असल्यामुळे ती त्यांनी पाइपमध्ये आणली एवढेच मला त्यांचे कौतुक वाटते. (हशा...) हे आत्मकथन खूप पारदर्शी, रसाळ असे झाले आहे. त्याचे कारण ठिबकप्रमाणे ते 'ठिबक' राहिले आहे! त्यांनी आपल्या पुस्तकात अनेक प्रसंग दिले, त्या सर्वांवर बोलणे शक्य होणार नाही. पण त्यातील निवडक म्हणजे लग्नाचा प्रसंग, कांताबाईंचे घरात येणे, मुलांचे शिक्षण, नंतर कांताबाईंचा प्रदीर्घ आजार आणि नंतर वियोग हे सर्व त्यांनी म्हटले तर स्वत:चे म्हणून आणि म्हटले, तर त्यामधून स्वत:ला दूर करून असे ते आपल्यापुढे मांडले आहे. यातून हे दोघांचे अद्वैत आहे. ते खूप जास्त जाणवते आणि ते कौशल्याने झालेले नसून, ते आतून आलेले आहे, असे मला वाटते.

मराठीमध्ये एकवचन आणि अनेकवचन अशी दोनच वचने आहेत. संस्कृतमध्ये एकवचन, द्विवचन आणि बहुवचन असते. अहम्, आवाम, वयम्. भाऊंचे आत्मकथन 'आवाम कथन' आहे. हे तिचे आणि माझे असे दोघांचे मिळून 'आम्ही दोघे' असे ते आहे आणि म्हणून 'आवाम कथन' आहे. आत्मकथन नाही. मुखपृष्ठावर आहे 'ती आणि मी', मला खरंच वाटते, की या पुस्तकाचे नाव 'ती आणि तिचा मी' असे असावे, अशी या पुस्तकाची भूमिका आहे. मॅडममध्ये ॲडम असतो.. वूमनमध्ये मॅन असतो; तसेच भाऊंमध्ये कांताबाईसुद्धा आहेत आणि त्यांचे हे सहजीवन बाई गेलेल्या असल्या, तरी चिरकाळ टिकणार, याची मला खात्री आहे.

• • • • •



## ज्येष्ठ समीक्षक, कादंबरीकार डॉ. भालचंद्र नेमाडे यांनी भाऊंच्या पुस्तकातील मूल्यांचा घेतलेला वेध



**"उद्योजकांचे जग मराठी साहित्यात वाढायला लागले, असे मलाही वाटायला लागले आहे. कारण, फार खोलपर्यंत विचार करणारी ही मंडळी असते. किर्लोस्करांपासून भाऊंपर्यंत आपण पाहिल तर आपल्या लक्षात येते की, देश बदलवणारे हे खरे लोक आहेत. आपण म्हणतो, की राजकारणी लोकांनी जग बदलले, साहित्यिकांनी जग बदलवले, विचारवंतांनी बदलवले. हे काही मला खरे वाटत नाही. आजची परिस्थिती लक्षात घेतली तर यापुढेही जग उद्योजकांमुळेच जास्त बदलेल."**

**मी** हे पुस्तक लिखित स्वरूपात एक महिन्यापूर्वी वाचले आहे. हे पुस्तक वाचता वाचताच माझ्या असे लक्षात आले, की सर्व यशस्वी उद्योजकांचे वैशिष्ट्य असे असते, की त्यांना सामाजिक व्याकरण अतिशय पक्क माहिती असते. समाजातील कुठे काय क्रिया, कर्तापद, कर्मगोष्टी काय चालल याची उद्योजकांना उत्कृष्ट माहिती असते.

माझी आणि भवरलालजींची ओळख अशीच झाली. मी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात काही कामानिमित्ताने गेलो असताना ते आले होते. तिथे महानोरांमुळे त्यांचा माझा परिचय झाला. ते सहज म्हणाले, की "नेमाडेसाहेब भेटत चला, दिल्या घेतल्याशिवाय काही वाढत नाही"...(हशा) हे एक सामाजिक व्याकरण आहे. भाषेचे आपल्याकडे लिहिले गेले जाते, सामाजिक व्याकरण काही लिहिले गेले नाही; पण उद्योजक आता लिहायला लागले, ही चांगली गोष्ट आहे. त्यामुळे साहित्यिक आपोआपच दुबळे दिसायला लागतील आणि उद्योजकांचे हे जग पुढे येईल. इतके दिवस कारण नसताना साहित्यिक स्वत:ला व्याकरण येते, असे समजत होते. ते चुकीचे आहे. एकेक उद्योजक जर पुढे आले तर आपल्याला काही फार लिहिण्यासारखे राहील असे मला वाटत नाही! (हशा)

उद्योजकांचे जग मराठी साहित्यात वाढायला लागले, असे ही मला वाटायला लागले. कारण, फार खोलपर्यंत विचार करणारी ही मंडळी असते. किर्लोस्करापासून भाऊंपर्यंत आपण पाहिले, तर देश बदलवणारे हे खरे लोक आहेत. आपण म्हणतो,की राजकारणी लोकांनी जग बदलले, साहित्यिकांनी जग बदलवले, विचारवंतांनी बदलवले. हे काही मला खरे वाटत नाही. आजच्या परिस्थितीत उद्योजकांमुळेच यापुढे जग जास्त बदलते आहे.

आपल्याकडे ज्या संस्था होत्या त्या एकेक करत नाहीशा होत चालल्या आहेत आणि आता त्याची भरपाई होत नाही. उदा. ग्रामसंस्था. इंग्रजांनी ठरवून ग्रामसंस्था मोडकळीस आणल्या आणि आता पंचायत सिस्टिम वगैरे असे काहीतरी सुरू आहे. प्रत्यक्षात पंचायत सिस्टिम कधीही अस्तित्वात येत नाही. (हशा...) आज ग्रामसंस्था मोडकळीला आल्या आहेत. आता गावात काही करणे शक्य झालेले नाही. दुसरी इंग्रजांनी ठरविलेली गोष्ट जी मोडून टाकली. ती म्हणजे आपल्याकडील कुटुंबसंस्था. जी संयुक्त कुटुंबं आपल्याकडे असायची. दहा-वीस लोक आनंदाने नांदत असायचे आणि रुसवेफुगवेसुद्धा वगैरे गुपचूपच चाललेले असायचे. उघड उघड कोणी कोणाला घराबाहेर काढले किंवा त्यांनी दुसरी केली, याने तिसरा केला, असे काही होत नसे.

अमेरिकेचे चित्र पाहिले तर, नेमका कोण कोणाचा? हे न कळण्याइतकी विवाहसंस्था विशाल झालेली आहे. (प्रचंड हशा) गौतम बुद्धसुद्धा संयुक्त कुटुंबातूनच आलेले आहेत आणि महावीर भगवान तीर्थंकर त्याातूनच आलेले. हे सर्व संयुक्त कुटुंबातून आलेले लोक आहेत. महादेवजी शिंदेंसारखा माणूस सुद्धा संयुक्त कुटुंबपद्धतीतूनच आलेले. युनिटरी फॅमिलीतून काही फार चांगले लोक मधल्या काळात आले, असे मला काही दिसत नाही. हा माझा दुराग्रह असेल किंवा मी संयुक्त कुटुंबातून आल्यामुळे मला तसे वाटत असेल; पण अलीकडे काही विषयांवरील संशोधन वाचले.

डार्विनची नुकतीच २५० वी जन्मशताब्दी झाली. त्यानिमित्ताने २००८ मध्ये मानसशास्त्रज्ञांची आमच्या संस्थेत इंडियन इन्स्टिट्यूट ॲडव्हान्स स्टडीजमध्ये खूप चर्चा झाली. १८०८ मध्ये जन्मलेला तो माणूस. मोठा सेमीनारच झाला या विषयावर.

आज जो चर्चेला विषय घेतला तो एमपीआय जो आपल्या सायकॉलॉजिस्टच्या लोकांना माहिती असेल. मेल पेरेंटल इन्व्हेस्टमेंट म्हणजे युरोपात आणि विशेषत: पाश्चात्य संस्कृतीत पुरुषाची आपल्या कुटुंबात किती गुंतवणूक असते, पेरेंटल इन्व्हेस्टमेंट किती असते यावर ती सबंध चर्चा आहे. पेरेंटल इन्व्हेस्टमेंट म्हणजे आपल्या स्वत:च्या काही बुद्धिमत्ता, आकांक्षा असतील त्या बाजूला ठेवून त्या मुलांपर्यंत पोहोचविणे किंवा त्या मुलांच्या वृत्तीत घालणे. आपल्या कुटुंबसंस्थांमध्ये नेमकी उत्क्रांती कोणती झाली? उत्क्रांतीचा अर्थ परिपूर्णता, परफेक्शन असा होत नाही. याचा अर्थ असा आहे, की जी परिस्थिती आज आपल्यासमोर आली आहे, तिच्यावर मात करण्यासाठी आपण कोणत्या योजना वापरतो, युक्त्या वापरतो, त्याचे एक रेकॉर्ड, एवढाच अर्थ उत्क्रांतीचा होतो. त्यामुळे संयुक्त कुटुंबातून युनिटरी फॅमिली ही उत्क्रांत झाली, असे म्हणण्यात काहीही अर्थ नाही किंवा ती झाली असली, तर ती परफेक्ट आहे, असेही म्हणण्यात काही अर्थ नाही.

**"आपल्या कुटुंबसंस्थांमध्ये नेमकी उत्क्रांती कोणती झाली? उत्क्रांतीचा अर्थ परिपूर्णता, परफेक्शन असा होत नाही. जी परिस्थिती आज आपल्यासमोर आली आहे, तिच्यावर मात करण्यासाठी आपण कोणत्या योजना वापरतो, युक्त्या वापरतो, त्याचे एक रेकॉर्ड, एवढाच अर्थ उत्क्रांतीचा होतो. त्यामुळे संयुक्त कुटुंबातून युनिटरी फॅमिली ही उत्क्रांत झाली, असे म्हणण्यात काहीही अर्थ नाही."**

कदाचित आपल्याला एक पाऊल मागे जाण्यासारखी परिस्थिती येईल. कारण, मुलांना सांभाळण्यासाठी एखादा माणूस भाड्याने ठेवण्यापेक्षा निश्चितच, आपली नातवंडे आजी-आजोबा हेच चांगली सांभाळतील, असे केव्हा तरी लक्षात येईल. मला मुद्दा असा सांगायचा आहे, की 'ती आणि मी'ची सुरुवात अशा या विवाहसंस्थेच्या, मुलगी पाहण्याच्या निमित्ताने भाऊंनी उत्कृष्ट साहित्यिकासारखे स्वत:पुरता ते जग न ठेवता कांताबाईंच चरित्र म्हणूनच ते आत्मचरित्र लिहिलेले असते. आपल्याकडे असे एक उदाहरण आठवते, स्मृतिचित्राचे की स्वत:ला विसरुन बाईंनी रेव्हरंड टिळकांचे चरित्र लिहिले. ही जी दुर्मीळ गोष्ट साहित्यात घडते, की आत्मचरित्र लिहून त्याचे चरित्र लिहिणे, हे फार थोड्या साहित्यिकांना जमते. परंतु दुसऱ्याचे चरित्र लिहावे आणि आपलीही त्याच्याशी जी जडणघडण आहे त्यात ती मांडावी, याचे उत्कृष्ट उदाहरण त्यात मला दिसले.

'ती आणि मी' पुस्तकात अशी उदाहरणे पानोपानी दिसतील. अतिशय गरीब कुटुंबात १५-१६ लोकं सांभाळली. मी जे म्हणालो, हे आपल्या लोकांचे एफपीआय जे चाललेले आहे, ते आपल्याकडे बदलून नुसता मानसशास्त्र हा विषय शिकविला जातो. जसे तत्त्वज्ञान हा एक अभ्यासक्रमातील विषय असतो, तसा मानसशास्त्र हाही एक विषय असतो. त्यामुळे आज आपली काय सामाजिक परिस्थिती आहे आणि त्याचे मानसशास्त्र काय आहे याचा नेमका अभ्यास आपण अजिबात करीत नाहीत. त्यामुळे आजची आपली जर परिस्थिती पाहिली तर आपले खरं एफपीआय असे रिसर्च व्हायला पाहिजे. हे फिमेल पेरेंटल इन्व्हेस्टमेंट किती असते? सगळीच गुंतवणूक आपल्याकडे असते. हे महात्मा गांधींपर्यंतसुद्धा दिसते की, स्त्रीचे गुण त्यांच्यात जास्त होते. त्यामुळे ते महापुरुष होऊ शकले आणि एवढा मोठा महापुरुष युरोपातसुद्धा मागील गेल्या शंभर वर्षांत झाला नाही. हे एफ.पी.आय., यावर एक सामाजिक संशोधन करून हे मूल्य म्हणून किंवा आपल्या देशातील मूल्य म्हणून ते मान्य करणे आपण आवश्यक आहे. एमपीआयपेक्षा एफपीआय त्यामुळे जास्त मोलाचे वाटते. या विषयावर आणखी एक नवीन विचार करता येईल.

दुसरे एक तत्त्व की, सुरवातच या तऱ्हेची आहे. की ते कुठेतरी नाशिकला मुलगी पाहायला चाललेले असतात त्यांचा एक मित्र असतो बरोबर. अशा वेळी हा मित्र फार महत्त्वाचा असतो. कारण, तो आपल्याला कान धरून बरोबर दाखवीत असतो. तसा हा बरोबर आहे. तो त्याला मुद्दाम कान धरून शिकवीत असतो. (हशा...) हेही पुन्हा आपल्याला तपासून पाहावे लागेल, की निवड हे आपल्याकडे चाललेलं असते ... ही निवड म्हणजे काय? तर ते शेवटी त्या कॉलममध्ये असते, ...चार ओळीत सांगितलेले असते. इतकं हास्यास्पद ते निवडीचं तत्त्व झालेलं आहे आता. म्हणजे त्याच्या शेवटी ज्याच्याकडे टाटा स्टीलचे इतके शेअर्स असतील तरच, असाच वर पाहिजे. एवढंच त्या निवडीच्या शेवटी द्यायचं राहिलं आहे. (हशा...) बाकी सगळं असते. हे निवडीचे सोंग म्हणजे पूर्णपणे भांडवलशाही, शहरी आणि पाश्चात्य असे हे एक खूळ आहे, असं मला वाटते. कारण, अशी कुठलीच मुलगी नसते किंवा वधू नसते की जी सुंदर नसते. तेव्हा पुन्हा सुंदर वधू पाहिजे हे म्हणण्यात अर्थ नाही.

दुसरी गोष्ट अशी आहे, की या सौंदर्याचे काय मूल्य असणार? आणि ते तुम्ही कसे काय ठरविणार, याचेही वस्तुनिष्ठ निकष नाहीत. पण शेवटी हे सामाजिकतेवर येते, व यातूनच ही निवड होत राहते. आपण जे पाहतो, की राजस्थानचा चारशे वधू-वरांचा मेळावा झाला किंवा भिल्लांचं मी स्वत: पाहिलं आहे, की सात-आठशे भिल्ल तरुणी आणि तरुण एकत्र आले तर त्या दिवशी त्यांची लग्न होतात. निवड एका दिवसापुरती असते, ते तिथे काही गोत्र, नाडी किंवा फ्लॅट किती आहे, प्रॉपर्टी किती आहेत, बहिणी किती आहेत, भाऊ किती आहेत असं काही नसतं. एका दिवसात ती सर्व लग्न होतात. म्हणजे तीन-चारशे लग्न निवड या तत्त्वावर होतात. म्हणजे ती निवड मला वाटते, की पाश्चात्य, उच्चवर्णीय, उच्च जातीय किंवा भांडवली निवडीपेक्षा जास्त चांगली असते, असे मी समजतो. कारण, ही लग्ने जास्त टिकतात. वर्तमानपत्रातील आणि प्रेमातली निवड झालेली कुटुंब टिकतील अशी मला खात्री देता येत नाही, असे इतिहास तरी सांगतो.

आपल्याकडील विवाहाच्या ज्या पद्धती आहेत, याचा अभ्यास केला, तर त्यात काही फार चांगल्या आहेत असे अजिबात म्हणता येणार नाही; परंतु आज आपण समजतो त्या मूल्यांपेक्षा याआधीच्या विवाहसंस्थेची मूल्यं फार महत्त्वाची. राजवाड्यांपासून अगदी अलीकडे लोकमान्यगृहाचे पळशीकर विवाहसंस्थेबद्दलचं पुस्तक. अगदी इतिहास जरी पाहिला तरी सर्वांनी सत्य मानलेले आहे, की शेवटी विवाहसंस्था ही टिकून आहे ती कशामुळे? तर मोनोगॉमीमुळे टिकून आहे. एक विवाह तत्त्व तर हे मानण्यावर आहे. एक विवाह स्त्री तत्त्व असते आणि एक पुरुष तत्त्व असते आणि त्यांचा एक जो संगम असतो तो एक सामाजीकरणासाठी आवश्यक असतो, म्हणून उत्क्रांतीच्या तत्त्वात विवाहसंस्थेचे तत्त्व मान्य झालेले आहे. अगदी पन्नास टक्क्यांपर्यंत अमेरिकेत फारकती जरी होत आल्या, तरी विवाहसंस्थेचे तत्त्व म्हणून कोणीही शहाणा माणूस रिजेक्ट करीत नाही. ते मान्यच करावे लागते. या गोष्टी अब्रेशन समजल्या जातात. म्हणजे जे व्हेरिएशन आहेत, हे तत्त्व नाहीत. हे तत्त्व म्हणून पाळणारे विहंगम दृश्य आपल्याला 'ती आणि मी' मध्ये सुरवातीपासून दिसते.

आपल्या देशातलाच एक मूल्य म्हणून मानलेला हा व्यवहार आहे. एकदा विवाह मानल्यानंतर, विनोदाची गोष्ट म्हणजे प्रस्तावनेत मी हे मांडलेले आहे, की भाऊंची आई असे म्हणते, की "ए बाबा एकदाच आपण लग्न करतो, ते तरी नीट करावे." (हशा...) अनेकदा लग्न करायचे असले तर बरोबर आहे... तुम्ही मग काहीही करा. एकदाच करायचं तर मग फार काळजीपूर्वक. तिच्या काकाला, हिच्या घरी.. शेजाऱ्यापाजाऱ्या लोकांना विचारून ते नीट करायला पाहिजे. हे बरोबर आहे. विशेषत: आणि तेही शेजाऱ्यांच्याशिवाय कोणी नीट सांगत नाही. (हशा) हे त्यातले फार महत्त्वाचे आहे. बारीकसारीक गोष्टीसुद्धा त्यातून बाहेर येतात आणि निवडीचे अगदी सुपर असे तत्त्व मला नाही वाटत दुसऱ्या कोणत्याही समाजाने विकसित केले असेल! म्हणून हे आपल्याला शिरोधार्य मानावे लागते. मी, शेवटी आणखी एक महत्त्वाचा मुद्दा मांडतो, की यातून जे सामाजीकरणाचं आणि फिमेल पेरेंटल गुंतवणूक असते, ती करताना नेहमी आपल्या गोष्टींना बाजूला टाकून मग आपल्या मुलापर्यंत त्या गोष्टी कशा जाव्यात याची ती गुंतवणूक असते. म्हणजे मग आपल्यात जे गुण आहेत ते त्याला सांगणं.


अगदी भाकरी करपू नये म्हणून ती कशी गिरवावी इथपासून ती गुंतवणूक असते. ही बारीक-बारीक गुंतवणूक त्याची कुठेही कॉलेज किंवा आयआयटीत नोंद नसते, ही घरातच मिळते. ही गुंतवणूक इतकी जबरदस्त असते, की ती जन्मभर पुरणारी असते. ही पुरेशी नसते; परंतु ती आवश्यक असते. त्यामुळे या गोष्टी आवश्यक परंतु अजूनही काही लागणाऱ्या असतात. त्याचा बेस असा हा होऊ शकतो हे आपल्याला या पुस्तकातून पानोपानी वाचायला मिळते. आता त्यातून 'त्याग' असे जे मूल्य म्हणतो, ते आपण जरा जास्त केले. 'श्यामची आई' हे पुस्तक आपण सर्वांनी वाचलेच असेल. सुदैवाने सर्वांना समजणारे व्याकरण एक आपल्याकडे असते. त्यात असे आहे, की बारीकसारीक गोष्टीतून आपल्याकडे आई पाहत असते, की अगदी मुलाला पडसे झाले, तर आपण काय खावे आणि काय खाऊ नये, एवढे त्यागापर्यंत उलगडत जाते. ज्याचा अमेरिकेन सोशॅलिजिस्ट चिप लेबर असा उल्लेख करतो! वाईफ म्हणजे काय 'चिप' लेबरच असते, की एवढ्या स्वस्तात इतके काम करणारी कोणीच मजूर मिळणार नाही! मग लग्न करून टाक बाबा. (हशा...) म्हणजे पैसे कोण देणार! इतक्या पैशात कोणाला टिकवायचे म्हणजे किती पैसे लागतात? पण घरच्या घरात सगळे होऊन जाते, झाडलोट, अगदी शेतकऱ्याच्या घरात तर सारवणे, वगैरे गुरांचे गोठे स्वच्छ करणे, चारा-पाण्यापासून, पाहुणेरावळे वगैरे सर्व करणे याला किती लेबर लागते? याची परतफेड आणि गुंतवणूक असे शब्द दिल्याशिवाय हे आपल्याला नीट समजून सांगता येत नाही.

**"एकभार्या प्रवृत्तीची संस्कृती जी आपण जोपासली आहे, 'ती आणि मी' सारख्या चांगल्या आत्मकथनात ठळकपणाने जाणवते. म्हणजे बहुभार्य तत्त्वामागील जे तत्त्व असते ते न पाळता आपण हे तत्त्व पाळले आणि विशेषत: मातृधर्मी जे झालो, मातृधर्मी असणे म्हणजे आपल्याकडे जसे विठ्ठलाला विठाई म्हणण्याची जी पद्धत आहे. मातृधर्मी असणे महत्त्वाचे आहे."**

आता कांताबाईंची गुंतवणूक कुटुंबात किती आहे? निश्चितच भाऊंपेक्षा जास्त आहे आणि त्यामुळे हे वाढते. त्याचे मोल करता येत नाही. ही मोल करण्याची जी सिस्टिम आहे, ती हंटिंग गॅदरिंगच्या नंतर नाहीशी झाली. घरातल्या कामाचे मोल काय? काही नाही! कारण, बाहेरचा कोणता तरी प्राणी मारून आणला तर प्राणी त्याचं मूल्य आहे; पण घरात भाकरी केली त्याचे मूल्य नाही. घरातल्या कामाचं मूल्य शून्य आणि बाहेरच्या कामाचं मूल्य वाढवले म्हणजे मग कॅपिटली सोसायटीनं इतकं वाढवले, की त्याला काहीच मर्यादा राहिली नाही. भूतानचे राजकुमार म्हणाले, की 'तुमच्या घरातील कौटुंबिक स्वास्थ्य किती आहे? याचे एक जागतिक मूल्य म्हणून ते ठरविले पाहिजे.' म्हणजे ग्रॉस इन्कम हे नाही, तर तुमचं घर किती सुखी आहे हे मूल्य ठरविणे हे अत्यंत आवश्यक आहे. हे जर अमेरिकेतील तुम्ही चार कुटुंबे पाहिली तर तुमच्या लक्षात येईल

एकभार्या प्रवृत्तीची संस्कृती जी आपण जोपासली आहे, 'ती आणि मी' सारख्या चांगल्या आत्मकथनात ठळकपणाने जाणवते. म्हणजे बहुभार्य तत्त्वामागील जे तत्त्व असते ते न पाळता आपण हे तत्त्व पाळले आणि विशेषत: मातृधर्मी जे झालो, मातृधर्मी असणे म्हणजे आपल्याकडे जसे विठ्ठलाला विठाई म्हणण्याची जी पद्धत आहे. मातृधर्मी असणे महत्त्वाचे आहे. आपली कसोटी यापुढे दिसेल. आता ग्रामसंस्था नाहीशी झाली. आता कुटुंबसंस्था नाहीशी होईल, लग्नसंस्थाही नाहीशी करायची का? ही उत्क्रांती आहे का? याचा विचार केला तरच आपल्याला पुढच्या पिढीला काही मूल्ये जगाला देण्यासाठी काही करता येईल.

## पद्मभूषण मा. न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी यांचा प्रकाशन सोहळ्यातील उत्स्फूर्त संवाद



**"बाई आता आपल्यात नाहीत; पण होत्या तेव्हा आम्ही असे म्हणत होतो, की वेणीच्या दोन पदरांप्रमाणे एकमेकांत गुंफले गेले तरी ते स्वायत्त आणि स्वतंत्र होते. अशी स्वतंत्र आणि स्वायत्त जीवने जेव्हा होतात, तेव्हा संयुक्त कुटुंबाचा एक नवीन विकास होत असतो. विलीनीकरणातून गुलामगिरीला सुरवात होते, स्वायत्तता संपते. म्हणून विलीनीकरणाच्या ऐवजी हा एक सहजीवनाचा प्रयोग होता आणि ते सहजीवन कसे होते, हे समजून घेण्याकरिता हे पुस्तक वाचण्याची गरज आहे."**

**भाऊंना** मी उद्योजक म्हणत नाही, 'उद्योगसेवक' म्हणतो! भाऊंच्या जीवनाच्या अडचणीच्या वेळी पुन्हा माझी आठवण जर बरोबर असेल तर 'आर्बिट्रेटर' मला वाटते मीच होतो. मी चढ-उतार पाहिले. या पुस्तकाबद्दल बोलताना मी असे म्हणेल, की थोडेसे आपण हे समजून घेतले पाहिजे, की विवाहसंस्थेबद्दल बोलल्यानंतर आमच्या विदर्भाच्या सीमेवर वैनगंगा आणि वर्धा या दोन नद्यांचा संगम आहे; पण या संगमामध्ये एकही नदी विलीन होत नाही. त्या संगमातून नवीन नदीचा उगम होतो. त्या नदीचे नाव आहे प्राणहिता. ही जी प्राणहिता नावाची नदी आहे ती वैवाहिक जीवनाचे प्रतीक आहे, असे मी मानतो. कोणाचेही विलीनीकरण नाही; पण दोघांच्या जगण्यातून जे एक नवीन जीवन निर्माण होते ते फार वेगळे असते.

मी नागपूरला पहिल्यांदा एक छोटेसे घर बांधायला घेतले. आयुष्यात एकच घर बांधणार होतो. फार चिकित्सक होतो. माझ्या वडिलांचे जुने मित्र होते. त्यांना विचारलं. 'जरा नकाशा बनवून देता का?' त्यांनी मला प्रश्न विचारला की, 'घर बांधायचे की बंगला बांधायचा?' मला कळेना, की या दोघांमधला फरक काय? ते मला म्हणाले, 'ज्या वास्तूमध्ये साहेबांकरिता टॉयलेट आतमध्ये असतो तो बंगला आणि' ज्या वास्तूमध्ये स्वयंपाकघर आत असते आणि टॉयलेट बाहेर असते त्याला घर म्हणतात, या दोनपैकी काय बांधायचे?' मी त्यांना म्हटले, 'या दोघांचाही समन्वय बांधायचे!' (हशा).

प्रश्न उपस्थित होतो 'घर' नावाची संस्था आता राहिली का? घरपण राहिले का? नवरा-बायकोचा संसार असतो, नवरा-बायकोचे कुटुंब नसते. आपल्याकडे पद्धत आहे बायकोलाच कुटुंब म्हणण्याची; पण ते कुटुंब नसते. नवरा-बायकोच्या पलीकडे बाकीचे रक्त संबंधी असतात. सासू-सासरे असतील, आई-वडील असतील, दीर-नणंदा असतील, तेव्हा घराची सुरवात होते, पण त्यात त्याने पोट भरत नाही, मग स्वायत्त नाती येतात. प्रेमाची खरी सुरवात स्वायत्त नात्यापासून होते. त्यानेही काही पोट भरत नाही. एक प्राणी असला पाहिजे, असे वाटते पूर्वी गाय असेल, आता कुत्रा, मांजर जे असेल ते असेल, पण मानलेली नाती रक्तसंबंधी यांच्यापुढे जाऊन प्राणी आपल्या घरामध्ये शिरतो आणि त्यानेही पोट भरत नाही, तेव्हा असं वाटतं बगीचा असावा, झाडं असावी, तुळस असावी.

माझ्या मुंबईच्या फ्लॅटमध्ये जागा नाही, पण एकच तुळशीचं रोप आहे आणि तीच सगळ्यात जास्त प्राणवायू देते पण वनस्पती, प्राणी, मानलेली नाती, रक्तसंमंधातली नाती जेव्हा एकत्र राहतात, तेव्हा पारिवारिक भावना-कौटुंबिक भावना आपण म्हणतो, त्याची सुरवात होते. भवरलालजींचे घर अशा कौटुंबिक भावनेचे प्रतीक आहे, असे मी म्हणतो. त्या प्रतीकामधून जसजशी कौटुंबिक भावना वाढत जाईल आणि जागतिक स्वरूपाची होईल, मी असे मानतो, जागतिकीकरणातला तो सगळ्यात मोठा प्रयोग असेल! कुटुंबामध्ये माणूस उपभोग गरजेप्रमाणे घेतो आणि काम मात्र ताकदीप्रमाणे करतो. तुम्हालाही माहीत आहे, मलाही माहीत आहे हे कुटुंबाचं वैशिष्ट्य आहे. तिथे कोणतीही दुसरी भावना नसते. फक्त स्नेहाने आणि प्रेमाने बांधलेली नाती असतात. तसे कुटुंब जसे भाऊंनी आजपर्यंत टिकविले त्याच्याबद्दल अजूनही मला आश्चर्य वाटते.

बाईंबद्दल लिहित असताना भाऊंनी भरभरून लिहिले त्यात आत्मनिवेदन आहे म्हणतात; पण या आत्मनिवेदन शब्दामध्ये 'नैवेद्य' या शब्दाला अर्थ आहे ना, तोही सामावलेला आहे. हे नुसते आत्मकथन नाही, याचे वाचन करीत असताना तुम्हाला थोडेसे समजून घ्यावे लागेल. बाई आता आपल्यात नाहीत; पण होत्या तेव्हा आम्ही असे म्हणत होतो, की वेणीच्या दोन पदरांप्रमाणे एकमेकांत गुंफले गेले तरी स्वायत्त आणि स्वतंत्र होते, अशी स्वतंत्र आणि स्वायत्त जीवने जेव्हा होतात, तेव्हा संयुक्त कुटुंबाचा एक नवीन विकास होत असतो. विलीनीकरणातून गुलामगिरीला सुरवात होते, स्वायत्तता संपते. म्हणून विलीनीकरणाच्या ऐवजी हा एक सहजीवनाचा प्रयोग होता आणि ते सहजीवन कसे होते, हे समजून घेण्याकरिता हे पुस्तक वाचण्याची गरज आहे. यात पारदर्शकता आहे. जी मला सगळ्यात जास्त आवडली.

घराणे मारवाडी आहे. मी मारवाड्यांसोबत फार राहिलो. मारवाडी जेवणही मला आवडतं; पण बनियाचं वर्णन करताना असं म्हटलं गेलं, की 'जो सबका बन जाता है, और जो सबको अपना बना लेता है उसको बनिया कहते हैं' असा हा भवरलाल जैन बनिया आहे. खानदेशात आल्यानंतर सर्वांचा झाला. सर्वांच्या बरोबर राहिला. ज्या पद्धतीने या माणसाने एक संयुक्त घर उभे केले . मी जैन समूहाला एक संयुक्त कुटुंबच मानतो आणि मी जेवढं बघितलं आहे. त्यात मला असं दिसलंय, की त्याची भूमिकाही तशीच आहे. एक नवीन रोग आलाय. आजकाल त्याला 'ॲफल्यूएंझा' म्हणतात. मी 'ॲफल्यूएंझा' पाहिला होता, पण 'ॲफल्यूएंझा' पासून जो येतो त्याची लागण अजून आपल्या घराला झालेली नाही. त्याचे कारण असे आहे, की ज्या पद्धतीनं तुम्ही जगला आणि माझा स्वतःचा अनुभव असा आहे, की ज्या माणसाने आयुष्यात एकदा गरिबी पाहिलेली असते तो माणूस उभ्या जन्मात तरी भ्रष्टाचारी कधी होत नाही. त्याचे मुख्य कारण असे आहे, की वाईटात वाईट काय होईल की पुन्हा गरीब होऊ आणि स्वायत्त गरिबी जेव्हा असते तेव्हा ती शक्ती टाटा, बिर्लांच्या करोडो रुपयांपेक्षा जास्त असते.

**"जैन परिवाराचा जात्याचा पाया स्थिर होता. त्याच्यामुळे वरच्या माणसांना फिरता आले. वाढता आले आणि या सगळ्यांमधून एक नवीन भूमिका निर्माण झाली. यातून हे पुस्तक निर्माण झाले. भाऊ मला कळते, की या वयामध्ये सोबतीण गेली म्हणजे गर्दीमध्येही माणूस एकटा होतो आणि एकाकीपण जाणवते."**

मला हे पुस्तक पाहताना आत्मप्रत्ययाचा अनुभव आला. उपचार घेताना कॅन्सर झाल्यानंतर लिलावती हॉस्पिटलमध्ये मला सांगण्यात आले, की आता ती मॉर्टियालिटी झोनमध्ये गेली, चमत्कार झाला तर जगेल. माहीत नाही काय चमत्कार झाला ती त्या झोनमधून बाहेर आली. मी माझ्या पद्धतीनं विचारलं तिला, 'काय तू स्वर्गात जाऊन आली ना?' तिथे देव-देवता सगळे होते आणि आम्ही हिंदू लोक तिथे जाण्याकरिता जन्मभर प्रयत्न करीत असतो. तिथे पोहोचल्यानंतर तू परत का आलीस?' तिने तितक्याच सहजतेने मला उत्तर दिले होते. 'तिथे देव-देवता सगळे होते ना; पण तुम्ही नव्हते म्हणून परत आले!' (टाळ्या) एकच वाक्य होतं हसतहसत बोललेली. भाऊ असे हे जीवन असते तुमचे आणि बाईंचे. या जीवनामध्ये तुम्ही तटस्थेने लिहितो म्हटले, तरी तटस्थेने लिहिणे कठीण जाते.

आत्मनिवेदन असलेल्या आत्मकथनाबद्दल असे म्हटले जाते, की तुम्ही स्वतःला वगळून तटस्थतेने ते लिहिलं पाहिजे, पण तटस्थतेमध्ये जर संवेदनशीलता नसेल तर तटस्थतेला अर्थ असतो का? दगड तटस्थ असतो का? बथ्थडपणा म्हणजे तटस्थपणा ऐकायचा विचार करावा लागतो. आता भारतकुमार राऊत म्हणाले, ते खरंच आहे. दोन्ही प्रकारची माणसे एकच असतात. (हशा) मोठी असली, की ती मूर्ख असतात. मूर्ख असल्याशिवाय माणूस मोठा होत नाही, सहसा माझ्या देशात.

बाईंचे आणि भाऊंचे हे चरित्र वाचत असताना मला रमण महर्षींची आठवण झाली. रमण महर्षींना एकदा विचारले होते, की गांधी जगभर प्रवास करतात, भारतात प्रवास करतात, तुम्ही एकाच ठिकाणी स्थिर असताना दोघांची विचारशैली एकच आहे, असे कसे होते? तेव्हा रमण महर्षींनी उत्तर दिले, 'जात्याचे दोन भाग असतात, एक स्थिर असते आणि एक फिरणारे असते.' स्थिर आणि फिरणारे यांचा समन्वय झाला नाही तर कणिक बाहेर येत नाही म्हणून बाई या स्थिर जात्याचा भाग होत्या. भाऊ हे वरती फिरणाऱ्या जात्याचा भाग होते. (टाळ्या) अशा या संयुक्त जीवनातून जे निघत ते 'ती आणि मी' असते. 'ती आणि मी' हे जेव्हा वेगवेगळे होत नाही तेव्हा त्याची शक्ती वेगळी असते आणि त्यातून निघणारे वेगळे असत. दोन महिन्यांपूर्वी गुजरातमध्ये गेलो होतो. तिथे एक नवीन शायर आला होता. त्याने दोनच वाक्ये लिहिली - "एक खता हम उम्रभर करते रहे, धुल तो चेहरेपर थी लेकीन आयना साफ करते रहे" (टाळ्या) परंतु या सगळ्यातून वर जाऊन आपला चेहरा स्वच्छ ठेवून स्वच्छ घर आणि स्वच्छ कुटुंब निर्माण करणे हेच सगळ्यात मोठे बाईंचे जैन कुटुंबात योगदान होते, असे मी मानतो.

जैन परिवाराचा जात्याचा पाया स्थिर होता. त्याच्यामुळे वरच्या माणसांना फिरता आले. वाढता आले आणि या सगळ्यांमधून एक नवीन भूमिका निर्माण झाली. यातून हे पुस्तक निर्माण झाले. भाऊ मला कळते, की या वयामध्ये सोबतीण गेली म्हणजे गर्दीमध्येही माणूस एकटा होतो आणि एकाकीपण जाणवते. गांधींनीही असे म्हटले आहे, की मी इतके आरसे पाहिले की आता मला माझा चेहराच उरला नाही. हे सगळे पाहता कधी-कधी असे वाटते, की आपण आंधळ्यांच्या बाजारात तर आरसे विकत नाहीत ना? त्या बाजारातून जेव्हा एखादा चेहरा उचलून घ्यावा लागतो, प्रकट करावा लागतो. आपल्या बायकोबद्दल लिहिणाऱ्या माणसाबद्दल माझ्या समाजामध्ये चांगले मत नाही, जास्तीत जास्त त्याला बायल्या म्हणतात. पती-पत्नीच्या नात्यामधून आपण काही समजून नाही घेत. पतिव्रता स्त्रीबद्दल जेव्हा चांगले बोलले जाते तेवढे पत्नीव्रता पुरुषाबद्दल कधी बोलले जाणार

नाही. एक पत्नीव्रत असावे हे ठीक आहे; पण एक पत्नीव्रत पाळत असताना त्याला व्रती शब्द लावावा तो चुकीचा का वाटतो, हे मला कळले नाही; पण भाऊ हे परस्परांच्या वर एकमेकांत वाटून घेऊन तुम्ही या पुस्तकामध्ये जी एक नवीन भूमिका मांडली, त्या भूमिकेला मी आज संयुक्त कुटुंबातली शक्तीची भूमिका मानतो.


आज अमेरिकासुद्धा परिवाराकडे वळते आहे. नाहीतर त्यांचे वाक्य होते मदरहूडने आम्हाला काहीच मिळाले नाही. पुरुषाला शरण जावे लागते. त्यामुळे आम्ही गुलामच राहिलो. त्यांनी असेही वाक्य उच्चारले की विवाहसंस्थेमध्ये स्त्री ज्या त्यागावर उभी आहे असे म्हणता; पण तुम्ही हे विसरता, की गुलामाला त्याग करण्याचा अधिकार नसतो. ती तिच्या गुलामगिरीवर उभी आहे असे म्हटले पाहिजे. या परिस्थितीमधून एक नवीन आयुष्य कसे असते, त्यात त्यागाची भूमिका दिसते जाणीव नसते. गुलामगिरी तर नसतेच नसते; पण समर्पण असते. पण समर्पण असले तरी समर्पणामध्ये शरणागती नसते. शरणागती नसलेले समर्पण आणि त्या समर्पणातून निर्माण झालेले हे दोघांचे आयुष्य एक नवीन आयाम घेऊन आपल्यासमोर उभे राहते. आपण याचाही विचार केला पाहिजे की आपले घरपण संपले. मी ज्या संस्थांमध्ये काम करतो तुम्हाला आश्चर्य वाटेल अनाथाश्रमापासून वृद्धाश्रमानंतरचे एक पाऊल आहे. जिथे काहीच कोणी आपल्या हाताने करू शकत नाही. पलंगावर झोपलेल्या स्थितीत सर्वकाही चालते. मला माहीत आहे वृद्ध असलेल्या आई-वडिलांना तिथे वृद्धाश्रमात ठेवल्यानंतर मुंबईमधल्या मुलांना तेव्हा वेळ नसतो, ते जन्मदिवस करायला येत नाही. दिवाळीलाही येत नाही. त्याची फार अशी खंत माझ्या मनात नाही...

**"पुष्कळदा आठवणी या सोबतीपेक्षा मोठ्या असतात या आठवणीच्या भरवशावर माणूस सशक्तपणे जगू इच्छितो आणि आठवणींच्या भरवशावर इतक्या सशक्तपणे माणूस जगतो की, आयुष्यामध्ये कधीच पाऊल वाकडे पडत नाही. ती शक्ती त्या आठवणींमध्ये असते."**

वृद्धाश्रमातील काम करणाऱ्या बाईने मला एक दिवस फोन केला आणि ढसाढसा रडायला लागली. मी म्हटले, "काय झालं विद्याताई, आज रडायला?" ती म्हणाली, "साहेब सगळं सहन केलं, पण हे नाही सहन झालं." मी म्हणालो, "काय नाही सहन झालं?" म्हणाली, "त्या आमच्या बाई आज वारल्या त्यांच्या मुलाला कळवलं. मुलाने फोनवर मला सांगितले मी येऊन जे करणार आहे ते तुम्ही करवून घ्या आणि बिल फक्त पाठवून द्या." या मुक्कामावर तुम्ही हे पुस्तक वाचा. जिथे घरात जागा नाही म्हणून सांगतात तिथे घराचे घरपण संपते. एका बाईने मला सांगितले, "सासऱ्याला मला वृद्धाश्रमात ठेवावे लागेल, कारण घरात जागा नाही." मी तिला विचारले, "तुझी आई आली तर," ती म्हणाली, "आईची गोष्ट वेगळी असते." मनातच जागा नसते. ज्यांच्या मनातच जागा नसते, त्यांचा राजमहाल असला तरी घरात जागा नसते. आणि ज्यांच्या मनात जागा असते ना त्यांच्या झोपडीमध्येही जागा असते. तुमच्या मनातल्या जागाच गेल्या! (टाळ्या) तुम्ही घराचे घरपण घालवले. संस्था कराव्या लागत नसतात, संस्था होत असतात, हे संयुक्त कुटुंबाने मला शिकविले.

माझा धाकटा नातू आहे. आम्ही चार न्यायमूर्ती जेवायला बसलो होतो. त्याच्या आईने त्याला काहीतरी सांगितले की माझ्या कानात जाऊन सांग. तो कानाजवळ आला आणि मोठ्याने ओरडला की बाबा भाजी संपली आता मागायची नाही! (हशा) एवढें साधे होते. त्याची आई नाराज झाली, त्याची आजी नाराज झाली, त्या मुलाला काय माहिती की खोटे आणि खरे केव्हा बोलावे? सात दिवसांनी त्याच्या काकाचा फोन आला. काकाने घरी असताना त्याला सांगितले, की सांग मी घरी नाही. त्यादिवशी तो मुलगा खोटे बोलणे शिकला. खरे बोलणे शिकवावे लागत नाही. खोट बोलणे शिकवावे लागते. तुम्हाला वाईट वाटते ते मी सांगू इच्छितो. आता मी पणजोबा झालोय. "नातवांवर चांगले संस्कार करण्याच्या भानगडीत पडू नका, फक्त तुमच्या वाईट संस्कारापासून त्यांना वाचवा." (टाळ्या) संयुक्त कुटुंबपद्धतीमध्ये बाईंनी बाहेरच्या सगळ्या वादापासून, कुसंस्कारापासून हे घर वाचविले आणि या कुसंस्कारापासून दूर ठेवीत एक सशक्त संयुक्त कुटुंब उभे केले. 'ती आणि मी' पानामधून तुम्हाला कळेल, की माणूस जगतो तो कशासाठी? स्वतःसाठी जगतो, की इतरांसाठी जगतो याचा हिशेब नसतो. त्यात त्यागाची भावना असते. यामध्ये बाई इतरांसाठी जगते असेही म्हणत नाही. मी किती सोसल, असेही ती म्हणत नाही. आम्ही दोघं फक्त जगलो एवढेच ती म्हणाली. या दोघांच्या जगण्याला मी सहजीवन म्हणतो आणि हे पुस्तक म्हणजे सहजीवनाचे प्रतीक आहे असे मी मानतो.

पुष्कळदा आठवणी या सोबतीपेक्षा मोठ्या असतात या आठवणीच्या भरवशावर माणूस सशक्तपणे जगू इच्छितो आणि आठवणींच्या भरवशावर इतक्या सशक्तपणे माणूस जगतो की, आयुष्यामध्ये कधीच पाऊल वाकडे पडत नाही. ती शक्ती त्या आठवणींमध्ये असते.



## ज्येष्ठ साहित्यिका डॉ. विजया राजाध्यक्ष यांचा अध्यक्षीय मागोवा



"हे पुस्तक वाचताना
असा प्रश्न पडला होता, की
अरे इतके प्रगल्भ असे निवेदन
आणि इतकी स्वच्छ, सुगम अशी भाषा
प्रथमच पुस्तक लिहिणारा माणूस
कशी काय अवलंबात आणू शकतो?
पण तसे नाही. त्यामागे एक साधना आहे
आणि साहित्याविषयीची ती साधना आहे.
साहित्य म्हणजे काय? आणि ते कशा
पद्धतीने आपण एकूण निर्माण केले पाहिजे
याविषयीची सैधांतिक नव्हे;
परंतु अतिशय नैसर्गिक कल्पना आहे.
म्हणूनच पारदर्शकतेचा उल्लेख झाला,
ती पारदर्शकता मनाचीपण आहे
आणि भाषेचीही आहे."

**स्त्री**च्या दृष्टिकोनातून हे पुस्तक मी तीनदा वाचले आहे. दोनदा मुखपृष्ठाविना आणि आत्ता पाहिले ते मुखपृष्ठासकट! आणि ते मुखपृष्ठासकट पाहणे अत्यंत आवश्यक होते. मुखपृष्ठ पाहिल्यावर आतला मजकूर ठळक समोर आला. याचे कारण असे आहे, की जे मुखपृष्ठ आहे ते अतिशय समर्पक आहे. मला असे वाटते, की भारतकुमार राऊत यांनी त्या मुखपृष्ठाचा योग्य अर्थ लावला.

मलाही एका वेगळ्या पद्धतीने तो अर्थ लावावा वाटला, की त्या पुस्तकामधील 'ती' प्रथम आहे 'मी' जो आहे पान उलटल्यानंतर दिसतो. खर तर या स्त्रीच्या खिडकीतून तो 'मी' कडे पाहतो आणि ती स्त्री इतकी उदार आहे, की 'तो' खिडकीतून पाहत असला आणि डोकावत असला तरीही त्याची पर्वा न करता, त्याच्या एकूण कुतूहलाविषयी आणि भाविकतेविषयी फारसा विचार न करता, त्याला आपले संपूर्ण दर्शन देते. याचे कारण 'ती' आदीमाया आहे किंवा रामदास भटकळांनी नुकतेच लिहिलेले आहे तशी, 'जगदंबा' आहे! जगदंबा यामधल्या 'जगत्' वर मी भर देते.

या पुस्तकामध्ये एक देशीपण आहे. खरे तर भवरलालजींनी देशात परदेशात खूप भ्रमंती केली आहे, त्या भ्रमंतीचा एकूण परामर्श काही पानांमध्ये त्यांनी घेतलेला आहेच, पण असे असूनही ते देशी राहिले. कारण त्यातली 'ती' ही पूर्णपणे देशी आहे. तिने जरी त्यांच्याबरोबर प्रवास केलेले असले तरी! कारण, परदेश प्रवास हा त्यांच्या आयुष्याचा एक लहान भाग होता. 'सहप्रवास' हा खरा महत्त्वाचा, आणि तो खानदेशातल्या वेगवेगळ्या गावांमध्ये आणि खानदेशी मातीतच केलेला.

मला नेहमीच वाटते, की ज्या मातीने आपल्याला बहिणाई दिली ती माती कांताबाई देणारच! कारण त्या मातीमध्ये अशी काही बिजे आहेत, की जी या पद्धतीने अंकुरणारच. तिनेच आपल्याला महानोरांची कविता दिली आणि 'तिची कहाणी' ही आपल्याला सांगितलेली आहे. मी म्हटले, की हे देशीपण आहे. देशी असले किंवा स्थानिक असले तरीसुद्धा एका अर्थाने ते वैश्विक होतं इतकं मोठ्ठं सत्य स्त्री विषयी, कुटुंबाविषयी पती-पत्नींच्या नात्याविषयी, कुटुंबाचा विस्तार हे कधी दोघं मिळून तर कधी एकटी कशी करतात याविषयी इथे अतिशय मौलिक, पण कुठलेही प्रवचन न करता, विचार मांडलेले आहेत. त्यामुळे एकप्रकारचे साधारणीकरण या पुस्तकाला प्राप्त झालेले आहे. संस्कृत साहित्यशास्त्रज्ञ अभिनव गुप्त यांचा एक सिद्धांत आहे, त्याचा मी उल्लेख करते.

यात भावविवशता नाही, उदात्तीकरणही नाही, म्हणजे त्याच्या जागा भरपूर आहेत; पण त्या टाळलेल्या आहेत. भवरलालजींचे व्यक्तिमत्त्वच असे आहे, की जाणीवपूर्वक त्यांना त्या सहजपणाने टाळता आलेल्या आहेत. आम्ही शाळेत जे शिकलो आणि नंतर कदाचित विसरलो त्या मो. र. केशव दामलेंचा उल्लेख करते. हे जे शीर्षक आहे त्यात सर्वनामे आहेत. 'ती' हे सर्वनाम आणि 'मी' हेही सर्वनाम; पण हे पुस्तक वाचल्यानंतर आपल्याला कळते, ही जरी सर्वनामे असली तरी प्रथम ती विशिष्ट व्यक्तींची नावे आहेत, म्हणजे कांताबाई आणि भवरलालजी. अनेक अर्थाने या नावांना हे विशेषत्त्व प्राप्त झाले आहे.

एका गोष्टीचा पुन्हा एकदा व्याकरणिक अशा पातळीवर उल्लेख करते, की यातलं 'आणि' उभयान्वयी अव्यय आहे, तेही फार महत्त्वाचे आहे. ते दोन समान व्यक्तींना जोडते. 'ती किंवा मी' नाही, 'ती परंतु मी' नाही. 'ती आणि मी' या 'आणि' ला मला वाटते, की फार महत्त्व आहे! आणखी थोडे व्याकरणाविषयी बोलायचे झाले तरी हे जे निवेदन आहे ते प्रथमपुरुषी आहे, पण ते प्रथमपुरुषी वाटत नाही. आपण म्हणालात त्याप्रमाणे हे एकमुखी नाही, हे द्विमुखीय आहे. तो जो आवाज आहे, तो आपल्याला त्याच्या आवाजातून ऐकू येतो. इतकंच नव्हे; तर ते बहुमुखी आहे असे सुद्धा मी म्हणेल. याचे कारण भवरलालजींनी फक्त स्वत: कांताबाईंविषयी न सांगता त्यांनी यामध्ये त्यांच्यासंदर्भात आलेले पत्र, त्यांच्याबद्दलच्या आठवणी, त्यांच्या कधी कोण जाणे, पण घेतलेल्या मुलाखती यांचाही आवर्जून उल्लेख केलेला आहे. त्यामुळे फक्त भवरलालजी कांताबाईंविषयी बोलत आहेत असे नव्हे; तर आजूबाजूचीही माणसं हेही त्याच पद्धतीने विचार करतात, हे कळते.

एका प्रेमापोटी एका व्यक्तीविषयी चांगले बोलणे हे वेगळे. एका व्यक्तीनं आणि अनेक व्यक्तींनी तिला एकूण जणू अनुमोदन देणे ही गोष्ट वेगळी, ती इथे झालेली आहे. यामुळे या पुस्तकाची जी मांडणी आहे किंवा घाट आहे मला वाटते, की चरित्र, आत्मचरित्र दोन्हींची त्यामध्ये सरमिसळ झालेले आहे. एकप्रकारे त्याला मुक्त असे स्वरूप आलेले आहे. याला चरित्र म्हणावं, की आत्मचरित्र म्हणावं की आठवणी म्हणाव्यात. काय म्हणावं नेमकं हे कळत नाही. एखादं चांगलं पुस्तकच असे घाटाविषयीचे संभ्रम आपल्या मनात निर्माण करू शकते. कारण, तो घाट कधीही बंदिस्त नसतो. त्याला एक मुक्तपणा असतो आणि तो मुक्तपणा लेखकाने दिलेला असतो. बंदिस्तपणा हा आहे. तो प्रतिभासाधनमध्ये सुद्धा वगैरे अगदी पूर्वीपासून ठाऊक झालेला आहे. त्याचे मी महत्त्व नाकारत नाही. परंतु त्यापलीकडे कसं जायचं हे भवरलालजींना कदाचित उपजत असावं!

**"आपल्याला असे जाणवत राहते की, अनेक केंद्र या पुस्तकाला आहेत. अर्थातच, दोन प्रमुख केंद्र. 'ती आणि मी' आहेतच, परंतु या दोन केंद्राभोवती अनेक केंद्रे जरी निर्माण केलेली असली, तरीसुद्धा पक्की आहेत, स्थिर आहेत. यातील चिंतन, निरीक्षण अनेक घटनाप्रसंग यांवर आधारलेले आहे."**

'ती आणि मी' हे पुस्तक वाचताना असा प्रश्न पडला होता, की अरे इतके प्रगल्भ असे निवेदन आणि इतकी स्वच्छ, सुगम अशी भाषा प्रथमच पुस्तक लिहिणारा माणूस कशी काय अवलंबात आणू शकतो? पण तसे नाही. त्यामागे एक साधना आहे आणि साहित्याविषयीची ती साधना आहे. साहित्य म्हणजे काय? आणि ते कशा पद्धतीने आपण निर्माण केले पाहिजे याविषयीची सैधांतिक नव्हे; परंतु अतिशय नैसर्गिक कल्पना आहे. म्हणूनच पारदर्शकतेचा उल्लेख झाला, ती पारदर्शकता मनाचीपण आहे आणि भाषेचीही आहे. कुठेही वाचताना आपण अडखळत नाही. हे मी मुद्दाम सांगते आहे याचं कारण, एका वेगळ्या समाजात वाढलेली दोन माणसं आहेत आणि त्यामुळे त्या समाजात प्रचलित असे काही शब्द, असे काही वाक्यसुद्धा दोघांच्या संवादात येणे शक्य होते. आले असते तरी ते काही अनाठायी झालं नसतं, परंतु भवरलालजींनी तसं केलेलं नाही, त्यामुळे कुठेही आपण अडखळत नाही. अतिशय सरळपणानं ज्या ओघवत अशा शैलीत ते लिहिलेलं आहे त्या प्रवाहाला अनुसरुनच ते पुस्तक आपण वाचत जातो.

आपल्याला असे जाणवत राहते की, अनेक केंद्र या पुस्तकाला आहेत. अर्थातच, दोन प्रमुख केंद्र. 'ती आणि मी' आहेतच, परंतु या दोन केंद्राभोवती अनेक केंद्रे जरी निर्माण केलेली असली, तरीसुद्धा पक्की आहेत, स्थिर आहेत. यातील चिंतन, निरीक्षण अनेक घटनाप्रसंग यांवर आधारलेले आहे. आता हा जो काळ आहे तो फारसा मागचा काळ नाही. पण मनामध्ये असे येते, की हे सर्व ज्या काळात घडले आणि तो काळ कांताबाईंच्या निधनानंतर एका अर्थाने अंशत: संपला. जरी ते संयुक्त कुटुंब अतिशय उत्तम पद्धतीने पुढे चालले आहे. आताही असेच घडेल का, असा एक प्रश्न मनात येतो आणि त्याचे प्रामाणिक उत्तर स्त्रीच्या दृष्टिकोनातून पुन्हा द्यायचे झाले, तर मी असे म्हणेन, की अंशत: घडेल! काही कुटुंबात घडेल.

या पुस्तकातील मला खूप अशी काही आवाहक वाटलेली वैशिष्ट्ये सांगते. त्यांची जी पहिली भेट आहे ती मला लक्षणीय वाटते. परंतु केवळ अलीकडच्या परिभाषेत बोलायचं झालं, तर कांदे–पोहे पद्धतीनं अशी ही भेट झाली नसून, इथे एकमेकांशी एकमेकांनी केलेला सुसंवाद आहे. त्यात विसंवादही आहे आणि ज्या एका आत्मविश्वासाने कांताबाईंनी भवरलालजींच्या थोड्या अडवणाऱ्या प्रश्नांनासुद्धा उत्तरे दिली ती खरोखरी चकित करणारी आहेत. त्या काळात त्या पदवीधर होत्या, हे तर खरंच. पण शिक्षण आणि उपजत शहाणपण याचा संबंध तसा नसतो. एक उपजत असे शहाणपण असते ते त्यांच्याजवळ होते. त्यामुळे निर्णय घेतला गेला आणि तो निर्णय पटवला गेला, याचे कारण आपली जी निवड योग्य आहे हे कन्व्हीक्शन त्यावेळी होतं. त्यानंतर दोघांचीही जीवनशैली बदलली.

मला वाटते, की कांताबाईंची जीवनशैली अधिक बदलली, स्त्रीची जीवनशैली बदलतेच बदलते. कारण, एका घरातून तिला दुसऱ्या घरात जावं लागते. कधीतरी तिला सामावून घेतले जाते. कधी घेत नाही. निदान आजची परिस्थिती आहे. पण लेखकाने असे लिहिलेले आहे, की माझीही जीवनशैली बदलली. मला असे वाटते की पुस्तकात एक वाक्य आहे, "आता माझं स्वातंत्र्य संपले" म्हणजे बंधने आली म्हणजे तिने स्वखुशीने स्वीकारलेली अशी बंधने आहेत. तऱ्हेतऱ्हेच्या तडजोडी किंवा ॲडजेस्टमेंट म्हणू आपण, त्या दोघांनाही कराव्या लागल्या आहेत. त्या नेहमीच स्त्रीला अधिक कराव्या लागतात, त्याप्रमाणे नेहमीच कांताबाईंना अधिक कराव्या लागलेल्या आहेत. त्यांना कदाचित पुढे आपण करिअर करावे असे वाटले असते. आणखीही काही वाटले असते. कदाचित आपण वेगळं राहून संयुक्त कुटुंबापासून जरा वेगळे राहून त्यांच्या सहवासाचा निखळ आनंद उपभोगावा असंही वाटू शकले असते; पण त्यांना ते वाटले नाही. अर्थात भवरलालजींनी अगोदर स्पष्ट केलेले होते, तरी आणि मुख्य म्हणजे यामागे कुठलीही सक्ती नव्हती. त्यांनी स्वखुशीनं घेतलेला हा

निर्णय होता. तो निर्णय शेवटपर्यंत कायम राहिला. कुटुंब विस्तारत गेले, परिवार खूपच मोठा झाला. अनेक आप्तस्वकीय या कुटुंबात सामावले गेले. मुलं झाली. मुलांची लग्न झाली. सुना घरात आल्या. कांताबाईंनी त्यांच्यावरही संस्कार केले. आता आजकालच्या सासू आणि सून यांच्यामधील स्नेहसंबंधाबद्दलच्या सिरीयल्स जेव्हा आपण पाहतो, तेव्हा वाटतं, की जरा या चॅनेलवाल्यांना हे पुस्तक दाखवलं पाहिजे, की अशाही सासू असू शकतात.

कांताबाईंची जी एक भूमिका होती ज्याचा आता उल्लेख झाला ती म्हणजे जोडायचे. जोडणे हे फार कठीण काम असते, तोडणे हे अर्थातच सोपे असत; पण तोडण्यापेक्षा जोडण्याचे महत्त्वाचे जीवनसूत्र होते आणि त्यामुळेच हे सर्व घडू शकले. भवरलालजींची खूप वैशिष्ट्ये आहेत, त्यापैकी एक उल्लेख मी करते. जो इथे राऊत साहेबांनी केला होता, की स्त्रीच्या संवेदनेने हे पुस्तक लिहिलेले आहे. हे खरंच आहे! यात संवेदना ही आहेच, पण मला असे वाटते की ही संवेदना स्त्रीचे सामर्थ्य असते! आणि स्त्रीमधून पुरुषांमध्ये झिरपते. तशी ती आपल्यात झिरपलेली आहे आणि आपण ती सामावून घेतली आहे. ही बाब मला फार महत्त्वाची वाटते. त्या सर्व प्रसंगांचे वर्णन आता मी इथे करत नाही. ऐनवेळी मित्रांना जेवायला घेऊन येणे आणि ऐनवेळी धावपळ करुन सर्व करणे, हे आजच्या स्त्रीलासुद्धा करावे लागते. ती कितीही पुरोगामी वगैरे अशी असली तरीसुद्धा चातुर्य आहे. वेळप्रसंगी कठोरपणाही आहे; पण कोणाला काय आणि कोणाला काय द्यावं याचा विवेक आहे. प्रतिसाद देण्याची वृत्ती आहे. मला वाटते, की सुना इतक्या गुण्यागोविंदाने नांदल्या याचे कारण त्यांनाही काही स्वातंत्र्य दिले. त्यांच्याही स्वयंपाकाची तारीफही केली. फक्त आईच्या हाताचं जेवण आवडते असे मुलांनीही म्हटलं नसावे आणि त्यामुळे खटके, ताण हे काही फारसे आले नाहीत. (हशा...)

**“एकत्र कुटुंबामध्ये किंवा समाजामध्ये जे रीतिरिवाज आहेत, त्याबद्दलसुद्धा ओझरतेपणानं लिहिले आहे. मला असं वाटतं, की त्याबद्दल आपण अधिक लिहायला हवं होते. कारण मी या पुस्तकाला सांस्कृतिक दस्तऐवज मानते.”**

एकत्र कुटुंब होतं, त्यामुळे वाद अटळ होते; पण त्यामध्ये राहण्याचे जे फायदे आहेत ते भवरलालजींनी अतिशय सूत्रबद्धपणानं सांगितले आहेत. एकत्र कुटुंबामध्ये किंवा समाजामध्ये जे रीतिरिवाज आहेत, त्याबद्दलसुद्धा ओझरतेपणानं लिहिले आहे. मला असं वाटतं, की त्याबद्दल आपण अधिक लिहायला हवं होते. कारण मी या पुस्तकाला सांस्कृतिक दस्तऐवज मानते. (टाळ्या...) या दस्तऐवजाचे मूल्य हे जर रीतिरिवाजांबद्दल लिहिलेले असते तर अधिक वाढले असते. दुपड्यांसारखा आणखी एखाद्‌दुसरा पदार्थ पुस्तकात असला असता. मी भवरलालजींच्या घरी गेले होते. महानोरांच्या बरोबरच गेले होते. अतिशय उत्तम आतिथ्य झालं. जैन हिल्समधील माझे दोन-तीन दिवस खूप चांगले गेले होते. महानोर होते, वहिनी होत्या; पण दुपड्या खायला मिळाल्या नाहीत! (हशा...) तेव्हा पुन्हा एकदा येणे आवश्यक आहे आणि सुना चांगल्या आहेत, कारण, कांताबाईंनी शिकवले. मी महानोरांना आता विचारले, मी जेवायला थांबते; पण मला त्या दुपड्या खायला मिळतील, तर मी थांबते! आता आंब्याचे दिवस नसतांना कुठे त्या दुपड्या मिळणार? मी आताच सांगितल्याप्रमाणे हे दोन असे केंद्रबिंदू आहेत. त्यामुळे न संकोचता भवरलालजींनी आपल्या उद्योगविश्वाबद्दलसुद्धा लिहिले आहे. त्यामधील चढउतार, ताण-तणाव, पेच प्रसंग याबद्दल; परंतु कुठेही ‘ती’ कडून ‘मी’ कडे येताना उड्या मारल्या जातात असे वाटत नाही. अतिशय स्वाभाविकपणे ‘ती कडून मी’कडे निवेदन कसे सरकते किंवा आठवणी आणि मुलाखती इत्यादी घटक यामध्ये कसे सामावले जातात. हे कळूही नये, असा काहीतरी एकजीवपणा या पुस्तकात आलेला आहे. पण आपण ते स्वाभाविक आहे असेच म्हणू. आणखी एक गोष्ट मला वाटते, तेही मी सांगते. कारण, या इतक्या मोकळ्या पुस्तकाबद्दल बोलायचं असेल, तर आपणही मोकळं बोललं पाहिजे, की कांताबाई आणि भवरलालजी यांचा जो आधीचा संवाद झाला, काहीसा बौद्धिक पातळीवर झालेला तो संवाद आहे, तसे पाहिले तर त्यांच्यात चढ-उतार, ताण-तणाव हे झाले. खटके उडाले, त्याबद्दलच्या सूचना आहेत. म्हणजे असं नाही, की सगळं काही छान होते. शेवटचे जे प्रकरण आहे ते तर फारच छान आहे. भवरलालजींची सर्व चिंतनशीलता आहे, त्यांची आत्मपरीक्षणाची वृत्ती आहे, ती या सबंध शेवटच्या प्रकरणात व्यक्त करण्यात आली आहे. विशेषत: मी मराठीची प्राध्यापिका असल्यामुळे सांगते, मी जास्त वाचणार नाही, पण आत्मपरीक्षण जर म्हटलं तर ते आत्मपरीक्षण करताना त्यांनी किती गोष्टींबद्दल प्रश्न निर्माण केले. त्यांनीसुद्धा, ‘अरे होतीच चांगली हं! माउलीच होती बिचारी!’ असं काही त्यात केलेलं नाही. त्यांनी दोन-तीन प्रश्न जे उपस्थित केले, ते मी वाचून दाखवते. अर्थात त्यांच्या मनात अनेकही असू शकतील कदाचित! ‘माझ्याप्रती कांताबाईंचे समर्पण हे एकतर्फी होतं का? तिचं समर्पण माझ्या बुद्धिचातुर्यातून तिच्यापर्यंत उगळलेली गुटी होती का? तिचं समर्पण हे पुरुषप्रधान संस्कृतीचा एक आविष्कार होता का? त्या वेळच्या सामाजिक व कौटुंबिक परिस्थितीचा परिपाक होता का? मला असे वाटतं, की अत्यंत वेचक, मार्मिक अशा पद्धतीने हे प्रश्न उपस्थित केले गेले आहेत आणि वाचक हे संपूर्ण पुस्तक वाचल्यानंतर म्हणतो की, या सर्व प्रश्नांची उत्तरं नकारार्थी आहेत. कारण या पुस्तकामध्ये नुसती समर्पणाची वृत्ती नाही, तर मी म्हटल्याप्रमाणे ठाम भूमिका आहे. स्वत:ची ओळख जपण्याची स्वाभाविक अशी ऊर्मी आहे आणि ती शेवटपर्यंत टिकलेली आहे. तीच ओळख मला वाटते की, भवरलालजींनी जपलेली आहे. दोन समविचारी भावना ज्याच्या तीव्र आहेत, एकमेकांवर ज्यांना प्रेम आहे, वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये वावरलेली आहेत, म्हणजे त्यातील एक क्षेत्र घर असेल आणि दुसरे उद्योगाचे क्षेत्र असेल, त्या माणसांमध्ये स्वाभाविकपणेच काही अहंकारयुक्तता निर्माण होतात. ‘इगो इशुज’ असे आपण म्हणू. पण ते इथे कुठे निर्माण झालेच नाहीत याचे कारण दोघांचीही एकमेकांना सामावून घेण्याची अशा प्रकारची वृत्ती असे नक्कीच आणि अतिशय ठामपणाने म्हणावेसे असे वाटते.



'ती आणि मी' मधील चिंतनाचा मी उल्लेख केला आहे आणि आत्मपरीक्षणाचाही उल्लेख केला आहे. वाचून दाखवावे इतके ते चांगले आहे. एकत्र कुटुंब हे नेहमीच सुखावह असते असे नाही, असे आजच्या एकूण वातावरणाकडे पाहून वाटते. त्यामुळे ही कल्पना आता कालबाह्य झालेली आहे का? ही शंका इथे येते. इथे एकत्र कुटुंब पद्धतीविषयी विचार आहेच, स्त्रीभ्रूणहत्या, गर्भजल परीक्षेसारख्या गोष्टींबद्दल आपण प्रश्न निर्माण करतो, चर्चाही करतो. विवाहसंस्थेबद्दल, विवाह साजरा करण्याच्या पद्धतीबद्दलही त्यांनी लिहिलेले आहे. आता विवाह साजरा करण्याची जी पद्धत आहे, आजकाल श्रीमंत लोकांमध्ये रूढ झालेली आहे. सॉरी, पण असे म्हणावे लागते 'ॲफ्युअन्स' असा शब्द कोणीतरी वापरला त्याच्या अनुषंगाने. आपण आता पुन्हा मागे चाललो आहे की काय असे वाटते! मांडव परतण्याऐवजी रिसेप्शन किंवा आदल्या दिवशी वेगळे काहीतरी... माझं लग्न रजिस्ट्रर पद्धतीने झाले त्यामुळे मला काहीच माहिती नाही यातील! त्यासोबतच संगीत, मेंदी वगैरे. असे मागे आपण जाऊ नये यासाठी प्रेरणा देणारे असे हे पुस्तक आहे, की नका जाऊ मागे! ते विसरा सगळे, आणि जे काही नवीन घडते आहे ते सर्व नवीन विवेकाने स्वीकारण्याचा प्रयत्न करा. स्त्रीमुक्ती चळवळीचा विचारसुद्धा रुजवण्यामध्ये फार मोठा वाटा यात आहे. या स्त्री मुक्ती चळवळीमध्ये असणाऱ्या स्त्रियांनी वाचावे आणि त्यांना समाधान वाटावे अशा प्रकारचे हे पुस्तक आहे. या पुस्तकात अध्याहृतपणे एक असे म्हणता येईल काल आणि आज यांची तुलना आहे. मुद्दाम त्यांनी केलेली नाही; परंतु ती तुलना आहे आणि कालबद्दल प्रेमाने बोलत असतानासुद्धा आजचा विचार लेखकाने केलेला आहे. सरधोपटपणाने काहीच कुठलंच विधान त्यांनी केलं नाही.

**"स्त्रीमुक्ती चळवळीचा विचारसुद्धा रुजवण्यामध्ये फार मोठा वाटा यात आहे. चळवळीमध्ये असणाऱ्या स्त्रियांनी वाचावे आणि त्यांना समाधान वाटावे अशा प्रकारचे हे पुस्तक आहे. या पुस्तकात अध्याहृतपणे एक असे म्हणता येईल काल आणि आज यांची तुलना आहे. मुद्दाम त्यांनी केलेली नाही; कालबद्दल प्रेमाने बोलत असतानासुद्धा आजचा विचार लेखकाने केलेला आहे. सरधोपटपणाने काहीच कुठलंच विधान त्यांनी केलं नाही."**

शेवटचा भाग खूपच छान वाटतो. कांताबाईंचा परिचय करून देताना त्यांनी जो परिच्छेद लिहिला आहे, त्यात त्यांनी कुटुंबात आणि जैन उद्योगविश्वामध्ये बांधिलकी कशी जपली, याचे एक मूर्तिमंत रूप म्हणून 'ती' कडे पाहिले आहे. "भवरलाल जैन कोण होते, अशी माझी ओळख कोणी मागितली तर त्याला उत्तर मिळावे 'ती आणि मी' या भावस्पर्शी शिलालेखातून भारतीय संस्कृतीची आंतर्ज्योत तेवत ठेवणाऱ्या 'ती'ला ज्यानी अक्षर केले, त्या कांताबाईंचे ते पती होते". म्हणजे इथे कुठेतरी स्वत:कडे दुय्यमपण घेतलेले आहे. 'ती' माझी पत्नी नाही, तर मी तिचा पती! इरावती बाईंची आठवण होते! ओळख करून देताना अमुक अमुकची ती आई असं म्हटल्यावर त्यांना जो आनंद मिळालेला होता, त्याप्रमाणे भवरलालजींना कांताबाईंचा मी पती म्हणजे मोठा उद्योजक, आणखी अनेक गुण असलेला अष्टपैलू असा विचारवंत हे सर्व खरं, चिंतनशील, संवेदनशील; परंतु मुख्य म्हणजे कांतासारख्या अतिशय मूर्तिमंत स्त्रीत्त्वाचे किंवा आदर्श स्त्रीत्त्वाचे उदाहरण म्हणून जिचे वर्णन करता येईल, अशा स्त्रीचा मी पती हा परिचय त्यांनी करून दिला आहे, ती खरोखरीच मनाला भेदणारा आहे. बऱ्याच पुरुषांनी, अनेक पुरुषांनी म्हणत नाही मी, कारण ते शक्य नाही. इतक्या अपेक्षा आपण करूच नयेत.

अर्पणपत्रिका वाचून दाखवते मी. 'अनोखं वाटणारं हे सत्य आत्मकथनपर हृदगत ज्या दाम्पत्याला भावेल ... आणि त्याने 'तसे' जगायचे ठरवले, तर त्याच्या सुख–समाधानाला भरती येईल' जी भवरलालजींच्या आणि कांताबाईंच्या जीवनाला आली. मला असे वाटते, की ती भरती अजून सरलेली नाही कारण त्यांच्या मनामध्ये भावना उचंबळत आहेत आणि त्या उचंबळीसकट हे पुस्तक लिहिलेले आहे. अतिशय 'भावस्पर्शी' असे हे पुस्तक आहे.

# मनोगत

## लेखक पद्मश्री डॉ.भवरलाल जैन यांचे अभिव्यक्त झालेले पुस्तकाविषयीचे हृद्‌गत



**“आजही असं वाटतं, की आज जो प्रकाशन सोहळा होतो आहे, हा तिला आवडेल का? सकाळपासून माझ्या मनाला हा विचार पिंगा घालतो आहे, की आपण हे करतो आहे आणि आपण तिच्याबद्दल लिहिलेसुद्धा; पण ती जर आज असती तर तिनं लिहू तरी दिले असते का? या गोष्टीचे समाधान आहे, की जे काही मी करेल ते योग्यच असेल, या विश्वासानंच ती जगली.”**

**या** पुस्तकात कोणतीही गोष्ट ओढून-ताणून आणलेली नाही. दुसरे असे, की कोणत्याही प्रकारचा अलंकार त्या घटनेला देण्याचा सुतराम प्रयत्न केलेला नाही. जे काही वास्तव आहे ते जर नागडे असेल, तरीसुद्धा ते चांगले दिसते, या विचाराने पछाडून हे पुस्तक दीड वर्षात मी पूर्ण केले आहे. त्या दीड वर्षाच्या आधी मी जवळपास दोन वर्षे विचार करण्यामध्ये घालवले आहेत. आजही असं वाटतं, की आज जो प्रकाशन सोहळा होतो आहे, हा तिला आवडेल का? सकाळपासून माझ्या मनाला हा विचार पिंगा घालतो आहे, की आपण हे करतो आहे आणि आपण तिच्याबद्दल लिहिलेसुद्धा; पण ती जर आज असती तर तिनं लिहू तरी दिले असते का? या गोष्टीचे समाधान आहे, की जे काही मी करेल ते योग्यच असेल, या विश्वासानंच ती जगली आणि म्हणून आपल्याला जो मूळ प्रश्न पडला आहे, की कधीतरी तिनं विरोध नोंदवला असेल ना! कधीतरी विसंवाद झाला असेल ना! कधीतरी असे झाले? होय. एक-दोनच असे प्रसंग मला आठवतात. दोन प्रसगांतला एक प्रसंग तिथे मांडला गेला की नाही, हे मला आठवत नाही; पण सांगतो...

एका लग्नकार्यात तिनं एक भडक रंगाची साडी घातलेली होती. सर्वसाधारणपणे एक पत्नीव्रत धारण केलेल्या माणसाला धर्मपत्नी कुठेही असली, कितीही गर्दीत तरी दिसते. लांबूनच फक्त मी तिच्याकडे पाहिले. तिच्याकडे पाहिल्यानंतर कदाचित तीही त्याच वेळी माझ्याकडे पाहत असेल, सांगता येत नाही. पण १५ ते २० मिनिटांच्या आत तिला पहिली संधी ज्या वेळी मिळाली त्या वेळी ती आत जाऊन मला पसंत असलेली साडी घालून आली. आता मला सांगा, मी तिला काहीही बोललो नाही. माझ्या डोळ्याने तिला मी खूण करू शकेल यापेक्षा जास्तीच अंतर होते. असे असताना तिला असं का वाटावे? ज्या वेळी आंतरिकरीत्या दोन जीव एकत्र येतात, त्या वेळी भाषेला विराम मिळतो, शब्दांना विराम मिळतो, फक्त शांततेतूनच हे घडते आणि ती शांतता आम्ही आयुष्यभर अनुभवली. तिलाही मला असे कधीच सांगावे लागले नाही, की तुम्ही आज नाही गेले तर चालणार नाही का?

एकच प्रसंग आहे. तोसुद्धा मी या पुस्तकात घेतल्याचे आठवते. उभ्या आयुष्यामध्ये हा माणूस केव्हा मुंबईला किंवा परदेशात जाईल, काहीच माहीत नाही. कारखान्यातून नुसता ऑपरेटरच्या हाताने परभारे एक फोन करायचा, की ‘भाऊ आता साडेनऊच्या गाडीने मुंबईला जाणार आहेत. तरी त्यांचे कपडे आणि जेवणाचा डबा हा आपण परभारे स्टेशनवर पाठवावे.’ तशी माझी परगावी जाण्याची बॅग नेहमीच भरलेली असायची. रिझर्व्हेशन करण्याचा प्रश्नच नाही, कारण रिझर्व्हेशन करून जाण्याचा कधी योगच आला नाही. असे असताना एक वेळा तिला फोनद्वारे निरोप गेला आणि मी घरी पोहोचलो, जेवलो. माझे जेवण होईपर्यंत ती काहीच बोलली नाही. कारण जेवण तरी व्यवस्थित होईल, हे तिच्या मनात असावे.

ती हळूच मला म्हणाली, “दोन-तीन दिवस नाही गेलात तर चालणार नाही का?” मला राग आला. मनोमनी राग आला. अरे! माझी एवढी मोठी महत्त्वाची अपॉईंटमेंट आहे, एक एजन्सी मला मिळणार आहे, भवितव्याचा हा प्रश्न आहे आणि म्हणते, “नाही गेले तर चालेल का?” म्हणजे काय? त्यामुळे त्यातला तो पुरुषांचा अधिकार किंवा अधिकपणा हा असेल, किंवा माझ्या स्वत:च्या

यशाबद्दल जर मला कुठे 'ग'ची बाधा झाली असेल तर त्याचा अंश असेल! माहीत नाही. पण थोड्या वेळाकरिता राग आला होता. क्षणार्धात. मी लगेच स्वत:ला आवरले, म्हटले, "होय, चालण्यासारखे आहे, पण काही खास." त्यावर ती म्हणाली, "हो, आत्ता अतुलच्या जन्माच्यानंतर मला टॉयलेटला वगैरे जाताना त्रास वाढला आहे. त्यामुळे जमत नाही. एक-दोन दिवस तरी तुम्हाला थांबावे लागेल" ही गोष्ट दुसरे कोणीही करू शकणार नव्हता. म्हणजे मलाच करणे भाग होते. एवढे केवळ तिने ध्वनित केले. मी मुंबईला जाण्याचा बेत रद्द केला आणि तिच्याबरोबरच दोन दिवस त्या कामासाठी, तेवढ्या वेळासाठी राहून, पुढचा माझा उद्योग सुरू ठेवला. मी म्हणतो, की हे दोनच संवाद अशा प्रकारचे घडलेले मला आठवतात.

'स्त्री'ला काही भावना असतात, याची वर्णनं मी खूप वाचली; परंतु त्यांचा आदर आपण करायला पाहिजे, अगदी मनापासून. ती 'स्त्री' सुद्धा तोलामोलाची तशी असली पाहिजे. मग तुम्हाला तो आविष्कार वेगळा वाटणार नाही. तुमच्याच व्यक्तित्त्वाचा तो आविष्कार आहे असे वाटले पाहिजे. असेच जीवनभर घडत राहिले. दोघांना बोलायचा असा कधी प्रसंगच आला नाही म्हणून मी त्या पुस्तकात लिहीले आहे, की पंचेचाळीस वर्षे बरोबर राहून पंचेचाळीस ताससुद्धा आम्ही संवाद साधला नाही. ज्याला लौकिकदृष्ट्या संवाद म्हणतो. बोलणे आणि चालणे. नाही साधला गेला. आमच्या जीवनात विषयच काय होते बोलायला? तिने तिच्या जीवनाचे ध्येय निश्चित केले होते. मी माझ्या जीवनाचे ध्येय निश्चित केले होते. दोन्ही ध्येयांची गोळाबेरीज करूनच जीवन जगावे, यातच आनंद आहे. हेही निश्चित झालेले होते आणि तो आनंद आम्ही उपभोगत होतो. पदोपदी आम्हाला त्याचा अनुभव येत होता, त्यामुळे फक्त शेवटच्याच क्षणाला... जसा आताच कविवर्य श्री. ना. धों. महानोरांनी उल्लेख केल्याप्रमाणे. त्यांनी फार थोडक्यात या विषयाला स्पर्श केला आहे. 'तिची वाचा गेलेली होती. या पुस्तकातली नायिका सोडून बाकी माझ्या चारही सुना सर्व महत्त्वाची पात्र आज उपस्थित आहेत. तेव्हा तुम्हाला कुठेही कोणत्याही प्रकारे जर असे वाटत असेल, की याचा खुलासा व्हावा तर यांच्याकडे बघा, त्यांना विचारा, ते सांगू शकतील, अगदी माझ्या नातवांपर्यंत हजर आहेत, माझी सर्व मुलंही हजर आहेत. त्यांनी जे जे काही पाहिले ते त्यांना माहितीच आहे. ज्या वेळी अशाही परिस्थितीत तिने स्वत:चा हात पलंगाच्या काठावर आणला, कोणालाच काही समजले नाही, तिला म्हणायचे काय? तिला काय हवे आहे? परंतु माझा मोठा मुलगा आणि मोठी सून यांनी तिची भाषा समजून घेण्याची एक निराळीच कला विकसित केली होती. त्यांनी वेगवेगळ्या क्लृप्त्या करून कधी लिहून दाखवायचे, की तुला हे म्हणायचे का? कधी हो किंवा नाही असं विचारायचे. 'ती' डोळे बंद करायची. कधी ते जमले नाही तर दुसरे काहीतरी करायचे आणि तिच्या प्रश्नाची उत्तरे शोधायचा प्रयत्न करायचे. कोणालाच जमले नाही.

**"ज्या वेळी आंतरिकरीत्या दोन जीव एकत्र येतात, त्या वेळी भाषेला विराम मिळतो, शब्दांना विराम मिळतो, फक्त शांततेतूनच हे घडते आणि ती शांतता आम्ही आयुष्यभर अनुभवली."**


जर तिला विचारले, की तुम्हाला डॉक्टरांना बोलवायचे आहे का? काही बोलली नाही. सर्व लोकांनी वेगवेगळे चार-पाच प्रश्न विचारले. पण मोठ्या सुनेला एकदम असे सुचले आणि तिने सांगितले, "आपको, भाऊको तसलिम करना है क्या? तुम्हाला भाऊंना नमस्कार करायचा आहे का?" त्या क्षणीच तिचे डोळे पाणावले होते. कदाचित ती तिची शेवटचीच इच्छा होती. 'आता मला निरोप द्या' आणि त्यावरुन नामदेवरावांना जी कविता सुचली आणि त्यांनी जी आठ ओळिची कविता लिहिली आहे, त्यात या गोष्टीचा उल्लेख आहे. 'मला परमेश्वराचे बोलावणे आले आहे. त्यामुळे तुमचा निरोप मला घेणे गरजेचे आहे'. हा जो प्रसंग आहे तो यातून जन्मला, की तिची शेवटची इच्छा होती. मी शेवटची इच्छा पूर्ण केली नाही, मलाही समजत होते, की शेवटची इच्छा आहे. नाही केली. कठोर झालो. कारण स्पष्ट होतं. माझ्या मनात अजूनही आशावाद होता की, ती जगेल. त्यानंतर साधारणत: तासभर ती जगली, शांतपणे डोळे लावूनच जगली आणि तिच्या डोळ्यांचे दान आम्ही एका नेत्रपिढीला दिले. एवढे ते डोळे बोलके होते.

जर तुम्हाला असे डोळे असतील, मग ते आंतरमनाचे असो किंवा बाह्य शरीराचे असो; तर तुम्हाला बोलण्याची गरज तेवढी भासू नये, मला तरी भासली नाही. तिने स्वीकारलेल्या धारणेप्रमाणे ते कधीच सांगितले नाही. तिने स्वीकारलेल्या धोरणाप्रमाणे वितुष्ट होणारे किंवा विसंगत होणारे काम कधीच सांगितले नाही. 'तू'आणि 'मी' हा अहम् यामुळे मावळलेला असतो. त्यामुळे विषय पांगत नाही, पसरत नाही. म्हणून तशा आठवणी काही जमेलाच नाही. काय करू? जर त्या असत्या तर त्याही एवढ्या प्रामाणिकपणे मांडल्या असत्या.

मागे वळून बघता, जर तिने ही भूमिका घेतली असती, की "तुम्हाला जे काय करायचे असेल ते तुम्ही करा. माझ्याशी नेमके लग्न तुम्ही कशासाठी केले. जर तुम्हाला हेच सगळे करायचे होते तर मला तुम्ही सोडून द्यायला पाहिजे होते किंवा लग्नच करायला नको.' एवढ्या टोकाची नसेल; पण काहीतरी साधारण भूमिका ती मांडू शकली असती, पण तिने तसे केले नाही.

• • • • •

# दिवंगत ज्येष्ठ विचारवंत डॉ. भा.ल. भोळे यांचा 'ती आणि मी' वरील प्रकाशनपूर्व अभिप्राय



डॉ. भा.ल. भोळे

**"या लेखनातून एका समंजस व परिपक्व सिंहावलोकनाचा प्रत्यय वाचकाला मिळू शकला. या कथनात पति-पत्नीचा प्रत्यक्ष म्हणता येईल असा संवाद फारच थोडा आहे, पण काळजाचा काळजाशी शब्देवीण झालेला आणि दोघांपैकी एकजण काळाच्या पडद्याआड अंतर्धान पावल्यानंतरही निरंतर सुरूच राहिलेला त्या दोहोंचा संवाद मात्र या संपूर्ण निवेदनाला व्यापून उरलेला दिसून येतो."**

**'ती आणि मी'** हे भवरलाल जैन यांनी त्यांच्या पत्नीच्या निधनानंतर लिहिलेले आपल्या सहजीवनासंबंधीचे निवेदन आहे. त्याला त्यांनीच दिलेले इंग्रजी शीर्षक सीमलेस सिंक्रनी-यातून जे सुंदर, सुखद व सौहार्दपूर्ण समसामायिकता सूचित होते, तेच या निवेदनाचे मध्यवर्ती सूत्र आहे. यात भावना आहेत पण भावविवशता नाही, जवळिकीच्या नात्याचा ओलावा आहे पण हळवेपणा नाही आणि स्मरणरंजन आहे पण गतकातरता नाही, त्यामुळे विलापगाण्याचा आर्तसूर या कथनाला लागलेला जाणवत नाही. सहजीवनाचे संदर्भ यात अपरिहार्यतः आले असले तरी ही मुख्यतः कांताबाई नामक एका मूर्तिमंत सोशिकपणाची, धीरोदात्तपणाची आणि नातीगोती जपण्यासाठी जीव टाकणाऱ्या एका गृहस्वामिनीपदाची हृदय कहाणी आहे. पत्नीच्या निधनानंतर लगेच हे लेखन न करता तीन-चार वर्षांच्या अंतराने ते केल्यामुळे चिंतनाला मिळालेला अवकाश लेखकाला तिची समग्र भूमिका समजून घेण्याच्या दृष्टीने उपयुक्त ठरलेला दिसतो. त्यामुळेच या लेखनातून एका समंजस व परिपक्व सिंहावलोकनाचा प्रत्यय वाचकाला मिळू शकला. या कथनात पति-पत्नीचा प्रत्यक्ष म्हणता येईल असा संवाद फारच थोडा आहे, पण काळजाचा काळजाशी शब्देवीण झालेला आणि दोघांपैकी एकजण काळाच्या पडद्याआड अंतर्धान पावल्यानंतरही निरंतर सुरूच राहिलेला त्या दोहोंचा संवाद मात्र या संपूर्ण निवेदनाला व्यापून उरलेला दिसून येतो.

कांताबाईंने जन्मभर जैन कुटुंबीयांसाठी ज्या खस्ता खाल्या, घरावर आणि घरच्या माणसांवर एवढेच नव्हेतर येणाऱ्या-जाणाऱ्या सर्वांवर जी अपार माया केली, लहान-मोठ्या समस्यांना शांतपणे सामोरे जातांना जो धीरोदात्तपणा दाखवला आणि रक्ताच्या नात्यांप्रमाणेच विस्तारित कुटुंबातल्या माणसांची नातीगोती जिवापाड जपताना काळीज मायेची पाखर घातली तीच या लेखनातून पानोपानी प्रवाहित होतांना दिसते. त्यामुळे खरेतर ही कहाणी कांताबाईंच्या आभाळाएवढ्या काळजाची आहे, त्यांनी केलेल्या काळीजमायेची आहे.

समजुतदारपणा, आव्हाने पेलण्याची जिद्द आणि शून्यातून विश्व साकार करण्याची प्रज्ञा या गुणधर्मात दोघांपैकी कोणीच कोणाच्या मागे नव्हते. काळाच्या चौकटीतही आपापला पैस (व्याप) सांभाळून जी श्रमविभागणी त्या दोघांनी केली होती तिला तोड नाही. 'ती आणि मी' यांची गोळाबेरीज केली की सगळ्या कमतरता दूर होतात आणि सर्व उणिवा भरून निघतात. लेखकाची भाषा एकूण प्रासादिक व ओघवती आहे.

डॉ. भा.ल. भोळे आज आपल्यात नाहीत. या ज्येष्ठ पुरोगामी विचारवंताची आणि भाऊंची निखळ मैत्री आणि तेवढेच आपुलकीचे संबंध होते. 'ती आणि मी' चे वाचन झाल्यावर त्यांनी दिलेला हा अभिप्राय. जैन इरिगेशनच्या विविध सामाजिक उपक्रमात त्यांचा लाभलेला सहभाग व मार्गदर्शन आजही तेवढेच मोलाचे आणि ताजे आहे.

# हिंदू विवाहसंस्थेचे मोल!

'स्मृतिचित्रे' (१९३४) हे लक्ष्मीबाई टिळक या साध्या गृहिणीने लिहिलेले आत्मचरित्र. मराठीत सर्व थरांतल्या वाचकांनी गौरवलेला अक्षरग्रंथ आहे, हे निरनिराळ्या सर्वेक्षणांमधून सिद्ध झाले आहे. हे आत्मचरित्र म्हटले जाते; परंतु ते नकळत लक्ष्मीबाईंचे पती रेव्हरंड नारायण वामन टिळक या कवींचे चरित्रही झाले आहे. 'ती आणि मी' हे भवरलाल जैन यांचे आत्मचरित्र असेच कांताबाई जैन यांचे चरित्र झाले आहे. आपल्या विवाहसंस्थेचे हे अगम्य रूप आहे, की पती-पत्नी हे उशिरा विवाहोत्तर एकत्र येऊनही किती एकमेकांशी एकरूप होऊ शकतात. आत्मचरित्राच्या सीमा ओलांडून चरित्रात जाणाऱ्या कथनांचे रहस्य या हिंदू विवाहसंस्थेतल्या संस्काराशी निगडित आहे. पतिव्रतांचे आदर्श आपल्या संस्कृतीत अनेक आहेत; परंतु हिंदू विवाहपद्धत एकपत्नीव्रती पुरूषांमुळेही भक्कम झाली आहे, हे फारसे ध्यानात घेतले जात नाही. दक्षिण अमेरिकेत अचानक गायब होणारे नवरे हा एक सामाजिक प्रश्न आहे. इंग्लंड-अमेरिकेत घटस्फोटित स्त्री-पुरुषांची संख्या निम्म्यावर जाऊ पाहते आहे. एकपालकी कुटुंबे प्रचंड संख्येने अमेरिकेत वाढत आहेत. हिंदू विवाहसंस्थेचे हे गौरवशाली स्वरूप समजले जाते, की तिच्यामुळे या अफाट देशातल्या हजारो जनसमूहांचे सामाजिक स्थैर्य शतकानुशतके अबाधित राहिले. याचा संबंध राष्ट्रीय आणि एकूण मानवी समाजाच्या मानसिक आरोग्याशी जोडला गेला पाहिजे. संयुक्त राष्ट्रांनी दरडोई राष्ट्रीय उत्पन्नाबरोबरच दरडोई कौटुंबिक समाधान, हाही एक प्रगतीचा पॅरामीटर ठरविला पाहिजे.

भवरलाल यांनी सर्व कुटुंबीयांशी विचारविनिमयाने पारंपरिक पद्धतीने जुळविलेला विवाह करण्याचे ठरविले, त्या वेळी व्यक्तिवादातून भोगवादी प्रवृत्ती नवविवाहितांना कशा अधोगतीकडे नेतात, हा त्यांनी वसाहतीकरणातून आलेल्या व्यक्तिवादाचा उत्तम प्रतिसाद केला आहे.

आधुनिक काळात आपण कोणीही अर्थातच व्यक्तिस्वातंत्र्याच्या विरुद्ध असू नये; परंतु या स्वातंत्र्याची परिमापके निश्चित नसल्याचे दुष्परिणाम आपण गेल्या दोन दशकांत वसाहतीकाळात अनुभवले आहेत. आपल्या परंपरेतल्या नैसर्गिक न्यायाने उत्क्रांत होत आलेल्या कितीतरी देशी-व्यवस्था परक्या संस्कृतीच्या अव्याहत दडपणाखाली मोडीस निघाल्या. अनेक सहस्त्रकांपासून विकसित होत आलेल्या आपल्या ग्रामसंस्था इंग्रजी वसाहतवादाने पायाखालीच पोखरून काढल्या. सत्तेचे आदर्श असे विकेंद्रीकरण आणि गणतंत्राचा आदर्श आविष्कार असलेली आपली ग्रामव्यवस्था दिल्ली-मुंबईशी जोडून त्यांचे सत्त्व इतके नष्ट करण्यात आले, की आता पंचायत राजच्या घोषणा करून फारसा उपयोग होत नाही. दुसरा आघात संयुक्त कुटुंबावर झाला. आपली विवाहपद्धत ही विडंबनाचा विषय झाला. यात साहित्यिकांचा मोठा वाटा आहे. आपल्या देशात आर्थिक-सामाजिक संसाधनांचे भान न ठेवता रोमँटिक पद्धतीचा व्यक्तिवाद बोकाळला...

**दै. महाराष्ट्र टाइम्स**
रविवार, ३ जानेवारी २०१०

# अलौकिक कांताबाईंची अक्षरगाथा : 'ती आणि मी'

चरित्राच्या चाकोरीतील व्याख्येप्रमाणे हे कांताबाईंचे चरित्रही नाही. भाऊंनी आपल्या बोलक्या अर्पणपत्रिकेत म्हटल्याप्रमाणे अनोखे वाटणारे हे सत्य आत्मकथनपर हृदगत आहे. आपल्या प्रिय सहचारिणीच्या वियोगाचा आघात त्यांनी कसा सोसला, या मध्यवर्ती आशय सूत्राभोवती गुंफलेली, हृदयाला भिडणारी, आठवणींच्या माध्यमातून मांडलेली 'बाई'ची व्यक्तिचित्रणात्मक जीवनकहाणी आहे.

आदर्श विचार व्यवहारात उतरविणे ही जीवनातील अलौकिकता आहे. ही अलौकिकता जगलेल्या कांताबाईंसारख्या एका साध्या सरळ; पण विचारी सहचारिणीच्या आयुष्याची ही अक्षरगाथा आहे. व्यापक अर्थाने जैन परिवाराच्या अनोख्या प्रवासाचीही ही कहाणी आहे.

हे पुस्तक लिहिताना भाऊ हळूवार होत काव्यात्म वृत्तीने सुभाषितांची पखरण सहज करतात. 'प्रश्नार्थक असणे हे एक स्त्री वैशिष्ट्य आहे' हे वाक्य त्यापैकीच एक; पण हे त्या काळच्या व्यवहारधर्माला मानवणारे नव्हते. कांताबाईंमध्ये समयसूचकता, चतुराई होती. त्या हळव्या होत्या; पण मुलाला शिक्षा करणे आवश्यक असताना त्या कठोर झाल्या होत्या. सिनेमा पाहण्याची आवड असूनही, एका घटनेनंतर कधीही सिनेमा न पाहण्याची त्या प्रतिज्ञा करतात. परिवारातील मुलामुलींना त्यांनी अमोल संस्काराची शिदोरी दिली. नन्नाचा पाढा वाचू नये आणि इतरांच्या घरची कोणतीही वाईट बाब आपल्या घरात काढायची नाही, ही त्यांची शिकवण होती. त्या क्वचित बोलत; पण ते सूचक व मार्मिक असे. इतरांनी आपल्याला समजून घेण्याचा अट्टाहास नसे. आपणच इतरांच्या भावभावना समजून घेऊन सहकार्याची वृत्ती जोपासणे जास्त महत्त्वाचे व सोपे, घर त्यामुळेच टिकते, हा त्यांचा अनुभव व विश्वास होता. पतीच्या मनाविरुद्ध काही करायचे नाही, तक्रारसुद्धा करायची नाही, असे बंधन बाईंनी स्वतःवर घातले होते. त्यांनी निकोप मनाने व समर्पण वृत्तीने जीवन व्यतित केले.

'भवरलाल जैन या व्यक्तीचे रूपांतर संस्थेमध्ये घडलं असेल तर त्या प्रक्रियेच्या संस्थापक होत्या, कांताबाई'.

त्या मिस्किल, खेळकर व विनोदी स्वभावाच्या होत्या. हात

उचलण्यासाठी नाही, तर उभारणीसाठी व सतत देण्यासाठी आहे, हा त्यांचा स्थायीभाव होता. द्वेष-भाव, आकस, मत्सर या दुर्गुणांचा वाराही त्यांनी स्वतःला लागू दिला नाही. घरात रमणाऱ्या बाईंचा महिला मंडळातही उत्साही सहभाग असे.

घरचं घरपण राखून, उत्तम, गृहिणी व्हा, जबाबदारीने आधी कुटुंब सांभाळा. कारण, त्यात यशस्वी होणे हे खरं जगण्याचे सौंदर्य ही त्यांची शिकवण होती.

या पुस्तकातून भवरलालभाऊ यांच्यातला वकील, बंडखोर समाजसुधारक, तत्त्वज्ञ, परखड टीकाकार व तरल संवेदनशील कवी यांचे दर्शन घडते. ४५ वर्षांच्या सहजीवनात व्यस्त औद्योगिक धावपळीमुळे कमीत कमी सहवास लाभला असल्याने स्वतः स्वतःच्या थोड्या आठवणींना परिवारातील सर्वांच्या आठवणींची जोड देऊन भाऊंनी बाईंचे मनोज्ञ व्यक्तिचित्रण केले आहे.

या पुस्तकात पूछताछ, जायजा व ढिंढोरा असे काही हिंदी शब्द व लहिणा हा खास अहिराणी शब्द भाऊंनी वापरला आहे.

भवरलालभाऊ यांच्यासारखा अग्रगण्य उद्योगपती आपल्या अलौकिक अर्धांगिनीबद्दल दिलखुलासपणे लिहितो आणि आपले प्रेम संयतपणे व्यक्त करतो, हे या पुस्तकाचे मोठे अप्रूप आहे.

या पुस्तकाच्या वाचनाने कौटुंबिक जिव्हाळा, समंजसपणा व सलोखा वाढीस लागो, तसेच उद्योजक साहित्यिकांना असे चांगले लिखाण करण्याची प्रेरणा मिळो.

मलपृष्ठावरील 'ती आणि मी'चे छायाचित्र व त्याखालचा मजकूर हा आगळावेगळा बदल लक्षणीय आहे.

**सुभाष सोनवणे**
**दै. देशदूत**
रविवार, २४ जानेवारी २०१०

# स्मरण मूल्यसंस्काराच्या आग्रहाचे...

उद्योग-व्यवसायातील एकेक आव्हान पेलताना, प्रगतीची रोज नवी शिखरे पादाक्रांत करताना कर्त्या पुरूषाला घरातून आधाराची मोठीच गरज असते. कुटुंबप्रमुख म्हणून ज्या व्यवधानांचा सामना करावा लागतो, त्यातून डोकेच वर काढता येणार नसेल, तर व्यवसायातील आव्हानांना अंगावर कसे घेणार? 'प्रत्येक यशस्वी पुरुषामागे स्त्री असते' ही उक्ती त्यातूनच जन्मली असावी. नव्या परिमाणांमध्ये प्रत्येक यशस्वी स्त्रीमागेही एक पुरुष असतोच; पण आपुलकी, मायेचा ओलावा नसलेल्या कोरड्या आधाराने भागत नाही. गेल्या काही दशकांमध्ये आपल्याही देशातील कुटुंबव्यवस्थेला तडे गेले आहेत. संयुक्त कुटुंबे हा पुरातत्त्वीय व संचितांचा भाग बनलाय. विभक्त कुटुंबांच्या वाढत्या प्रमाणाने नव्या चिंता जन्माला घातल्या आहेत. संस्काराची मूल्ये तसेच सामाजिक, आर्थिक, नात्यांमधील गुंतागुंती हे चिंतेचे व चिंतनाचे विषय बनल. हे सरसकट संपूर्ण समाजाचे चित्र आहेच. शिवाय, परंपरेने रूढीवादी समाजासाठी किंवा सांगण्यासाठी का होईना ज्यांचे मूळ महाराष्ट्राबाहेर आहे व त्यामुळेच इथल्या मातीत रूजताना ज्यांना अधिक सावध, संघटित व प्रखर रूढीवादी बनावे लागले, अशा जैन-मारवाडी समाजासाठी तर पुढारलेपण व पुरोगामित्त्वच्या नावाखाली सामाजिक खुलेपण परवडणारे नव्हते व नाहीच. अशा वेळी ही कुटुंबे एकसंध, एकजीव राहतात आणि एकजुटीने उद्योग-व्यवसायात मोठी हातात ती घरातील प्रमुख महिलेच्या केंद्रबिंदूमुळे थोरल्यांचा आदर-सेवासुश्रूषा, समवयस्कांना प्रेम, माया आणि छोट्यांना वात्सल्य, संस्कार देणाऱ्या, 'एका विशेष अर्थाने कर्तबगार महिला' अशा सगळ्याच कुटुंबामध्ये असतात, त्यापैकी मोजक्याच काहींचे हे कर्तृत्व समाजासमोर येते. बहुतेक जण अप्रकाशितच राहतात.

डॉ. भवरलाल जैन यांनी त्यांच्या दिवंगत पत्नी कांताबाई यांच्या आठवणीचे अनोखे आत्मकथन 'ती आणि मी' या नावाने लिहिले आहे.

कांताबाईंसंदर्भातील नानाविध आठवणींचे पदर अत्यंत ओघवत्या भाषेत भवरलालजींनी या आत्मकथनात गुंफले आहेत. तसे कांताबाई याच या लिखाणाचा केंद्रबिंदू असल्या, तरी ओघाओघाने एकाच वेळी उद्योजक म्हणून भवरलाल जैन यांची वाटचाल, समाजाकडे पाहण्याची त्यांची दृष्टी, संस्कारांच्या वेष्टनातून ती त्यांना देणाऱ्या मातोश्री गौराबाईंचे भावविश्व, त्यांच्यासह कुटुंबातील प्रत्येकाने पिढ्यांमधला विसंवाद टाळण्यासाठी केलेले प्रयत्न, विजापूर-पुणे-नाशिक-जळगाव अशा विविध ठिकाणांवरील समाजबांधवांच्या स्वभावाचे पैलू, १८६० पासूनच्या महाराष्ट्राच्या ग्रामीण समाजातील बदल व स्थित्यंतरे, वाकोद या खेडेवजा गावात राहणाऱ्या जैन कुटुंबाचे या मातीशी समरसलेपण, अशी अनेक कथानके 'ती आणि मी' मध्ये आहेत. जैन यांच्या लेखनशैलीचे वैशिष्ट्य हे, की ते आणि त्यांचा संघर्ष त्यांनी बाजूला ठेवलाय आणि सर्वाधिक लक्षात राहतात त्या कांताबाईच. प्रगत व पारंपरिक जगाचे त्यांचे नेमके भान, संस्कार व मूल्यांच्या जपवणुकीचा त्यांचा आग्रह आणि एक मोठे कुटुंब आपल्या व्यक्तिमत्त्वाच्या आसाभोवती गुंफून ठेवण्याचे त्यांचे कसब, या परिघातील प्रत्येकाच्या उणिवा सांभाळून घेण्याच्या त्यांच्या जाणिवा.

वाचताना आनंद घेण्याचे कसब आपल्यात असेल, तर या सगळ्या पैलूंचा चिरस्मरणीय आनंद देणारी ही लेखन कलाकृती आहे.

**श्रीमंत माने**
**दै. सकाळ**
रविवार, १४ फेब्रुवारी २०१०

# 'ती' आणि 'मी' विषयी .....

आजवर प्रसिद्ध झालेया मराठी साहित्यात आपल्या सहधर्मचारिणीवर मोकळेपणे व प्रामाणिकपणे लिहिणारे चारित्रकार व आत्मचरित्रकार अभावानेच आढळतात. स्पष्टच लिहायचे झाल्यास काहींनी आवश्यक तिथेच त्यांचा उल्लेख केला. आपल्या यशस्वी आयुष्याचे श्रेय ती च्या पदरात टाकण्याची दानत पुरुषसत्ताक समाजातल्या लेखकांमध्येही नव्हती. कस्तुरबांचा मोठेपणा ओळखणारे गांधीजी विरळाच. याला अपवाद जळगावच्या जैन उद्योगसमूहाचे संस्थापक-अध्यक्ष भंवरलाल हिरालाल जैन. उद्योगमान्यतेसारखीच त्यांच्यातल्या वाङ्मयीन सर्जनशीलतेने त्यांना साहित्यक्षेत्रात आज मान्यता मिळवून दिली आहे. त्यांच्या इतर पुस्तकांत समाजबांधणी, सामाजिक प्रश्न, पाण्याचे प्रश्न व नव्या पिढीशी संवाद इ. विषयांवरचे चिंतन येते; पण सगळ्यात महत्त्वाचे ठरते ते त्यांचे आत्मचिंतनपर पुस्तक ती आणि मी .

भंवरलालजी जैन व त्यांच्या पत्नी कांताबाई जैन यांच्या जवळपास ४५ वर्षांच्या सहजीवनाचा चढता-उतरता आलेख या पुस्तकात वाचायला मिळतो. Andre Mayruis ने एका ठिकाणी म्हटलं आहे, Happy marriage is a long conversation that always proves too short. हे सारं लेखन म्हणजे लेखकाने स्वतःशी केलेला आत्मसंवाद व मी ने ती चे केलेले मनोमन पूजन कांताबाईच्या निर्मल, पवित्र, परोपकारात व सहज आचरणामुळे भंवरलालजींच्या जीवनदृष्टी व जीवन आचरणावर झालेला खोलवर परिणाम याचं. हे पुस्तक म्हणजे मोकळं आविष्करण आहे. भंवरलाल जैन नेहमी म्हणतात मी म्हणजे मातीतला माणूस. या मातीशी, धरणीशी इमान राखून तिला सुजलाम- सुफलाम बनविण्यात हयात घालविली. या धरणीमातेनेसुद्धा त्यांच्या डोक्यावर वरदहस्त ठेवून केवळ ७००० रुपये बीजभांडवलावर सुरू केलेल्या व्यवसायाची वार्षिक उलाढाल ३००० कोटी रुपयांपर्यंत पोहोचवली. भाऊंची जोडीदारीणही अस्सल देशी मातीतलीच आहे. तिच्या सरळ साध्या देशीपणाने या जोडप्याचे सहजीवन सर्वच पातळीवर सहजसुलभ झाले.

कै. कांताबाई या सनातनी मारवाडी समाजात जन्मलेल्या पण पदवीधर शिक्षित युवती. लग्नानंतर माहेरपेक्षा टोकाचा फरक असलेल्या संयुक्त जैन कुटुंबात प्रवेश करतात. या कुटुंबाची जगण्याची पद्धत निमूटपणे स्वीकारतात व नवरा हेच दैवत मानून त्याच्या उद्यमशीलतेला प्रोत्साहन देण्यासाठी कौटुंबिक आघाडी समर्थपणे सांभाळतात. दोन खोल्यांच्या भाड्याच्या घरात वडीलधारी व लहान अशा १६ व्यक्तींकडे जातीने लक्ष देतात व कुटुंबाचा एकसंधपणा कायम ठेवण्यासाठी स्वतःचे समर्पण करतात. पत्नी, सून, आई, वहिनी, काकू या सगळ्या नात्यांमध्ये गुरफटलेली ही स्त्री कुटुंबाच्या उत्कर्षालाच मदत करते. तिचं मन नित्य आनंदी, उत्साही, स्वागतशील व संघर्ष होण्याआधीच तो मिटावा, अशा वृत्तीचे आहे. आयुष्यातला एक क्षण भंवरलालजींवर भाळण्याचा व उरलेले सारे क्षण त्यांचे नातेवाईक, परिवार, मित्र, उद्योगजगत यातील लोकांना सांभाळण्याचे. त्यांनी जैन कुटुंबाची काळजी घेतली व धुरा वाहिली.

असे समर्पणयुक्त जगत कांताबाई कशा जगल्या व का जगल्या याचे विवेचन व त्यायोगे जीवनातल्या अनेक प्रश्नांवरचे भंवरलालजींचे चिंतन पुस्तकात येते. भारतीय संस्कृती, कुटुंबव्यवस्था, विवाहसंस्था, सणवार, संस्काराचे महत्त्व, मुलांचे संगोपन व स्त्री-पुरुष संबंधांच्या अनेक पैलूंवर भाष्य त्यांनी यात केले आहे. ते नुसते आत्मचिंतन नाही, तर एक प्रामाणिक आत्मपरीक्षणदेखील आहे. व्यवसायातील धडपड, त्यासाठी करावे लागणारे अतोनात श्रम पण संयुक्त कुटुंबपद्धतीत राहण्याची इच्छा, या भूमिका त्यांनी आपल्यापुरत्या ठरवल्या होत्या. त्यात कुठेही तडजोड करण्याची त्यांची तयारी नाही. या पार्श्वभूमीवर आपल्या भूमिका पत्नीला सांगणे व त्या तिने आनंदाने मान्य करणे ही तारेवरची कसरत संसाराच्या सुरुवातीच्या काळात त्यांना करावी लागली. सुदैवाने सुविचारी कांताबाईंनी भंवरलालजींचे प्रेयस तेज आपले श्रेयस मानले व त्यांना साथ दिली. आज मात्र भंवरलालजींच्या मनात पत्नीच्या या कृतीबद्दल प्रश्न उभे राहतात. ते म्हणतात, माझ्याप्रति तिचं समर्पण एकतर्फी होतं का ? तिचं समर्पण माझ्या बुद्धिचातुर्यातून तिच्या गळी उतरवलेली गुटी होती का ? तिचं समर्पण हे पुरुषप्रधान संस्कृतीचा एक आविष्कार होता का, की त्यावेळच्या सामाजिक व कौटुंबिक परिस्थितीचा परिपाक होता ? एका असहाय, कमजोर किंवा हतबल महिलेची ती शरणागती होती का ? व शेवटी या निष्कर्षाप्रत पोहोचतात, की तिचे निर्णय अंतरात्म्यातून आलेल्या आवाजावर आधारित असत, त्यामुळे ती ते सहज स्वीकारीत असे. त्यात कुठलाही खेद किंवा खंत नसे. कांताबाईंचा अस्सल भारतीय स्त्रीमनाच देशी वाण याच त्यांच्या स्वभावातून उठून दिसतो. भारतीय स्त्रीमनाचा हेवा वाटावा, असे देवदुर्लभ कुटुंब भंवरलालजींना मिळाले. उद्योगाचा गोवर्धन उचलताना त्यांची करंगळी जरी सर्वशक्तिमान असली तरी त्यांचे काका, भाऊ, पुतणे व मुले यांचा आधार त्यांना मिळाला. आमदार सुरेशदादा जैन, डॉ. सुभाष चौधरी, डॉ. दोशींसारखे जिवाला जीव देणारे स्नेही मिळाले. या सर्व आनंददायी संबंधांना बांधून ठेवणाऱ्या त्यांच्या धर्मपत्नी कांताबाईंना कुटुंब, संस्कार व नातीगोती यांचा खरा अर्थ कळला होता. गृहिणी गृहमुच्छते स्त्री म्हणजेच घर हे सुभाषित त्यांना सर्वार्थाने उमगले होते.

आचार्य दादा धर्माधिकारी यांनी मांडलेल्या स्त्री-पुरुष सहजीवनाच्या कल्पनेला या जोडप्याने प्रत्यक्षात आणले. या दोहोंचे सह अस्तित्व नव्हतेच कारण भंवरलालजींनी म्हटल्याप्रमाणे एकमेकांसोबत राहण्याचा त्यांच्या आयुष्यातला कालावधी फार थोडा होता. ते दोघे जरी बरोबर जगले नाही तरी सतत बरोबर असत. त्यांचे जीवन नेहमीच परस्पराभिमुख राहिले. मन व ह्रदयाचा मेळ व त्यातून येणारे पती-पत्नीमधील मित्रत्व हेच सहजीवनाचे मुख्य सूत्र असते. कांताबाई व भंवरलालजींनी दादा धर्माधिकारींना अभिप्रेत सामाजिक कौटुंबिकतेची भावना आपल्या जीवनात अंगीकारली. सहजीवनाचे अधिष्ठान कौटुंबिक आत्मीयता असते व या आत्मीयतेचा आधार भावनिक संबंध असतात. ही आत्मीयता व भावनिकता स्वकुटुंबापुरती त्यांनी मर्यादित ठेवली नाही, तर कुटुंबाच्या व उद्योगाच्या संबंधात येणाऱ्या प्रत्येक रक्ताच्या व बिनरक्ताच्या व्यक्तीपर्यंत विस्तारीत नेली. साऱ्या समाजात मान्य होणाऱ्या मूल्यांची व भावी पिढीवर होणाऱ्या संस्कारांची नर्सरी म्हणजे गृहस्थाश्रम असतो, हे मानून आयुष्यातला हा काळ त्यांनी आनंदाने घालवला. एका अर्थाने ती व मी मधील

आत्मकथनाला जे वैश्विक परिणाम लाभले आहे त्याचे कारण या जोडप्याची ही दृष्टी हेच ठरते.

भंवरलालजी जैन व कांताबाई हे आजच्या आधुनिक काळात कौटुंबिक मूल्ये जपणारे एकमेवद्वितीय दाम्पत्य म्हणून पुस्तकातून आपल्यासमोर येते. जीवन जगत असताना त्यांच्या आयुष्यात आलेले सुखाचे, दुःखाचे, वैतागाचे, प्रेमाचे सौहार्दाचे, आपुलकीचे कृतज्ञतेचे व कृतघ्नतेचे छोटे–मोठे कालखंड यांचे वर्णन व त्या प्रत्येक प्रसंगात कांताबाईचे धीराचे, समंजसपणाचे, सहनशीलतेचे, औदार्याचे वर्तन लेखकाने अतिशय आत्मीयतेने चितारले आहेत. भंवरलालजी जैन यांच्या कर्तृत्वासाठी आवश्यक असलेलं स्थैर्य, दिलासा, प्रेमाची जपणूक व मनःशांती, त्यांना तीच्यामुळे मिळू शकली व कांताबाईसारख्या मनस्वी स्त्रीला एकत्र कुटुंब व त्यातून येणारे ताण–तणाव सहन करण्याचे व आनंदी राहण्याचे धैर्य मी वरच्या विश्वासामुळे व भरभक्कम पाठिंब्यामुळेच मिळू शकले. संसाराच्या सारिपटावरच हे सुंदर चित्रण भावी जोडप्यांना नक्कीच प्रेरणादायी ठरणार आहे. दोघेही स्वंत्रपणे पण एकत्र जगले व देशाबाबत व कुटुंबाबतच्या कर्तव्याचं पालन करीत राहिले.

अशा या आत्मचिंतनपर व उद्बोधक पुस्तकाला अतिशय अर्थगर्भ असे मुखपृष्ठ लाभले आहे. त्यातही ती आधी येते व मग मी पुस्तक वाचल्यानंतर मनात घुमत राहतो तो पुस्तकाचा शेवटचा परिच्छेद ज्यात स्वतःची ओळख देताना लेखक म्हणतो, ती आणि मी भावस्पर्शी शिलालेखातून भारतीय संस्कृतीची आंतरज्योत तेवत ठेवणाऱ्या ती ला ज्यांनी अक्षर केलेल त्या कांताबाईचे भंवरलाल जैन हे पती होते.

**डॉ. जया द्वादशीवार**
लोकमत



# प्रतिसाद

आपले पुस्तक अत्यंत काळजीपूर्वक व उत्कंठतेने वाचले. 'ती आणि मी' माध्यमातून मानवी स्वभाव, भाव-भावना, संस्कार, यांचं सुदर रितीने शब्दांकन झालं आहे. आपण अतिशय हळुवारपणे अद्ययावत घटनांची नोंद भावनिकतेने केली आहे. एखाद्या लेखकाने सराईतपणे एका उत्तम कथानकाचे अनेकविध पैलू वाचकांसमोर मांडावे त्या प्रमाणे आपण आपल्या भावविश्वाचे अनेक पदर हळूवारपणे उलगडून दाखविले आहेत. दैनंदिन जीवनातील घटनांचे, कौटुंबिक भाव-भावनांचे वेगवेगळे कंगोरे शब्दबद्ध करताना भाषेची सरलता व सौंदर्य जपून लिखाणाचा दर्जा उंचावला आहे.

भारतीय संस्कृतीतील संयुक्त कुटुंब पद्धतीचे सशक्त चित्रण या पुस्तकात झाले आहे. एकत्र कुटुंबाच्या जबाबदाऱ्या अखंडपणे स्वीकारित सुखद:खाची तमा न बाळगता सर्वांना प्रगतीच्या शिखराकडे नेताना धर्मपत्नीच्या समर्थ साथीची अभिव्यक्ती दिखुलासपणे व प्रांजळपणे मांडली आहे. कुटुंब व्यवस्थेच्या चौकटीत तीन पिढ्यांतील लहान-थोरांपैकी कुणाच्याही व्यक्ती स्वातंत्र्यास बाधा न पोचवता आपण परस्परांतील नातेसंबंधांची वीण व विश्वासाचा पाय अधिक मजबूत केलात.

केवळ पती-पत्नीच्या नात्याचाच नव्हे तर संपूर्ण कुटुंबाचा व पर्यायाने समाजाचा आधारस्तंभ असलेल्या 'ती' ला आपण अग्रस्थानी मानले व या पुस्तकाद्वारे त्यास 'मी' ची जोड देऊन परिपूर्णतेची अनुभूती दिलीत.

**डॉ. देवीसिंह शेखावत,**
राष्ट्रपति भवन, नवी दिल्ली -११०००४

●●●●●

'ती आणि मी' या पुस्तकाचे मुखपृष्ठ फार बोलके आहे. त्यात आपल्या दोघांच्या जिवनातलं अद्वैतच साकार झालेले आहे. एका टीकाकाराने लिहिले आहे, की एखादे पुस्तक वाचायला घेतल्यानंतर ते पुस्तक वाचूनच पूर्ण करण्याची भावना ज्या पुस्तकामुळे निर्माण होते, तेच पुस्तक वाचनीय होय. आपले पुस्तक वाचायला सुरवात केल्यानंतर ते पूर्ण होईपर्यंत पुस्तक सोडवत नव्हते. या पुस्तकाची भाषा सरळ, सोपी, भावस्पर्शी व रसाळ अशी आहे.

सदर पुस्तक हे संस्काराचे मार्गदर्शक आहे. भारतीय संस्कृतीतील प्रत्येक कुटुंबात हे पुस्तक गेले पाहिजे. सर्वांवर प्रेम करावे. सेवा, त्याग, सहनशीलता या सद्गुणांची पेरणी या पुस्तकाने केली आहे.

**डॉ. सुशीला शाह,**
चोपडा, जि. जळगाव

●●●●●

भारतीय संस्कृतीचे गुणगान करणारे अनेक थोरा-मोठ्यांचे विचार मी वाचले आहेत. तथापि, संस्कृती व संस्कार टिकवून ठेवणाऱ्या आधार-शिलेबद्दल शब्दरूपाने कृतज्ञतेची फुले वाहण्याचे औदार्य फारच क्वचित आढळते. आपल्या व्यक्तिमत्त्वांतील अनेक आकर्षक पैलूंपैकी हा पैलू मला सर्वाधिक प्रभावित करतो. म्हणूनच आपली मैत्री ही माझी फार मोठी उपलब्धी आहे.

**देवकिसन सारडा,**
नाशिक

●●●●●

(स्व.) कांताबाईंविषयी आपण इतक्या स्नेहाने व आत्मीयतेने लिहिले आहे. आपण ज्याला 'मातृगुण' म्हणता तोच सध्या विलक्षण दुर्मीळ झालाय. कृतज्ञता ही समाजात राहिली नाही; ते दोन्ही गुण आपल्यात व स्व. कांताबाईंमध्ये अपरंपार होते. मनापासून या गुणांना वंदन.

**डॉ. मु.ब. शहा,**
धुळे.

●●●●●

आज पर्यंत मी माझ्या कुटुंबासाठी, सासरच्यांसाठी जे काही करू शकले ते काहीच नाही. अतिशय नगण्य असून मी आखणी खूप काही करू शकते आणि करायला हवे असे पुस्तक वाचल्यानंतर वाटायला लागले. विवाह प्रसंगी नवदाम्पत्यास इतर कुठल्याही वस्तूपेक्षा हे पुस्तक अमूल्य अशी भेट ठरेल.

**सौ. संजीवनी पाटील**
जळगाव

●●●●●

या आत्मचरित्रातून भावस्पर्शी शिलालेखनातून भारतीय संस्कृतीची 'आंतज्योत' तेवत ठेवणाऱ्या (स्व.) सौ. कांताबाई या गाभाऱ्यातील तेजस्वी 'समई'चे विराट रूप साऱ्या जगापुढे मांडले आहे.

**सौ. चंदा सुराणा,**
मनमाड

●●●●●

अत्यंत सरळसाध्या सोप्या भाषेत 'ती' च्या अनुषंगाने जैन परिवाराचा इतिहास उलगडताना जो आपलासा वाटतो ही खरी जमेची बाजू. साने गुरुजींची 'श्यामची आई' वाचताना आपण साहित्य वाचत आहोत असे वाटत नाही. त्यांच्या विचारांशी सहज नातं जुळत आणि परकेपणा निघून जातो. हाच स्पर्श ती आणि मी च्या निमित्ताने प्रत्ययास आला आहे. एकत्र परिवार पद्धतीचे फायदे तोटे दर्शविणारा आलेख शालेय पुस्तकात शिकविला जातो परंतु या पुस्तकाच्या वाचनातून दूर गेलेली किंवा असलेली आपली नातीगोती, गणगोतं पुन्हा जवळ करावेसे वाटतील अस हे अनुभव कथन आहे.

**वासुदेव कामत,**
मुंबई

●●●●●

'ती आणि मी' आपल्या पिताजींनी लिहिलेले पुस्तक मिळाले. अत्यंत सुंदर, ह्रदयाला जाऊन भिडणारे असे पुस्तक! बारामतीत माझे मोठे बंधू आप्पासाहेब यांच्या तोंडून मी अनेकवेळा मा. भवरलालजींचे कौतुक ऐकले होते. बारामतीला कृषि विषयकच्या कार्यक्रमास मा. शरदरावांच्या उपस्थितीत झालेले कार्यक्रम पाहिले आहेत परंतु प्रत्यक्ष ओळख 'ती आणि मी' या पुस्तक रुपाने झाली, त्यामुळे आदर आणखीनच दुणावला.

कांताताई यांचे व्यक्तिमत्वाने मी मोहून गेले. मा. भवरलालजी, त्यांच्या आई, घरातील सर्वजण यांनी कांताताईंचे गुण ओळखून त्यांच्याकडे कुटुंबाची वडिलकी दिली व त्यांनीही ती अत्यंत जिव्हाळ्याने जबाबदारीने पेलवली. यात आपल्या वडिलांचा व आपल्या आजींचा मोठेपणा आहे. स्टेजवर आपल्या कर्तृत्ववान पतीशेजारी पत्नी बसलेली असते व अनेक वक्ते या थोर पुढाऱ्यांचे गुणगान करीत असतात 'परंतु या नेत्यांच्या कर्तृत्वात पत्नीचाही तेवढाच त्याग असतो हे कुणाच्याच ध्यानीमनी येत नाही, त्याचा उल्लेख ही होत नाही हे मनाला सलते, परंतु भवरलालजी यांस अपवाद आहेत. त्यांनी आपल्या पत्नीबद्दल वेळोवेळी गौरव उद्‌गार काढले आहेत. पत्नीच्या साथीमुळेच आपण यशाच्या पायऱ्या चढलो आहोत हे सांगायला ते विसरत नाही.

आमच्या आई काय किंवा कांताताई काय त्यांच्या सहकार्याशिवाय दोन्ही कुटुंबे पुढे गेलीच नसती. आमचे आई-वडील जाऊन इतकी वर्षे झाली परंतु आजही आम्ही सारे पवार बहीण-भाऊ भावंडे दिल्लीत जमतोच. जैन कुटुंबिय किंवा पवार कुटुंब काय लक्ष्मी हात जोडून उभी आहे. सर्वांचे पाय धरतीवर घट्टपणे उभे आहेत. शालिनता, सुसंस्कृतपणा याबाबतीत ही दोन्ही कुटुंबाची बरोबरी कोणीच करू शकणार नाही. या सुंदर पुस्तकाने माझ्या पूर्व स्मृती जागृत झाल्या. जग कितीही भौतिक सुखाच्या मागे जावो पण एकत्र कुटुंबास तोड नाही.

अत्यंत जिवंत भाषाशैली असलेले हे पुस्तक एका उद्योगपतीने लिहिले आहे हे खरेच वाटत नाही. या चरित्रात प्रांजलपणा व सत्यता असल्यानेच हे चरित्र अतिशय मनाला भिडते.

**सौ. स. ना. पाटील,**
मुंबई

●●●●●

'ती' होती म्हणून 'मी' मोठा झाला. 'तो' मोठा आभाळाएवढा झाल्यावर 'ती'ने श्वास सोडला. त्यातच 'तिची' कृतज्ञता, कृतार्थता व्यक्त झाली. नशिबाने ती थोर होती म्हणून आपले 'सौभाग्य' सोबत घेऊन गेली. जिथे कोठे असेल तेथे ती नक्कीच सुखी असेल; परंतु एकटी नसेल 'मी' सोबत असणारच!

**डॉ. श्रीनिवास डी. साठे,**
कल्याण.

●●●●●

'ती आणि मी' हे पुस्तक म्हणजे (स्व.) बाईंच्या प्रती व्यक्त केलेली आदरांजली आणि नव्या पिढीच्या दाम्पत्यांसाठी सुखाची पाऊलवाट असे आहे.

**किशोर कुलकर्णी,**
जळगाव

●●●●●

पुस्तकाची भाषा साधी, सरळ, सोपी वाटली. लिहितांना लेखकाचे आतडे कुठेतरी खोलवर तुटते आहे याची सदैव जाणीव होत राहते.

या देशातल्या राजकीय नेत्यांना व उद्योगपतींना व्यक्तिगत आयुष्य, त्यातली सुख-दुःखे असतात, याचे कुणालाच भान नसते. अगदी सरावलेले मुलाखतकारसुद्धा मुलाखतीच्या शेवटी एखादाच व्यक्तिगत प्रश्न अगदी दबकत-दबकत विचारतात. इथे एक हाडाचा भांडवलदार स्वतःच्या व्यक्तिगत जीवनाविषयी भडभडून बोलतो. नव्हे; स्वतःची 'मर्मबंधातली ठेव' उलगडून दाखवतो. या प्रयत्नाचे स्वागत आहे.

**चिंतामणी नांदेडकर,**
जळगाव

●●●●●

'ती आणि मी' या पुस्तकातून आपणा उभयतांचे अपूर्व सहजीवनच नव्हे तर आपले कुटूंब, आपला व्यवसाय आणि आपण ज्या भागात जीवन व्यतीत केले, त्या काळातील समाज जीवनही सहजपणे उलगडत जाते... वाचता वाचता या सर्वांचेच अनेकांगी दर्शन होते.

**सुहास बहुळकर,**
नाशिक

●●●●●

पती-पत्नीमधील अतूट नात्यामधील विविध पैलू उलगडून दाखवीत आपण व कांताबाई या दोहोंमधील मनाचा संवाद या आत्मकथनात साधला आहे. एकंदरीत आपल्या साधेपणाची छटा दिसणाऱ्या या प्रेरणादायी आत्मकथनात्मक पुस्तकातून समाजास नवजीवन दृष्टी लाभेल.

**दिनकर चौगुले,**
सहा. महाप्रबंधक, बैंक ऑफ महाराष्ट्र क्षेत्रीय कार्यालय,
जळगाव.

●●●●●

भाऊंचा साखरपुडा, निनावी पत्र, त्यानंतर शांततेने व संयमाने घेतलेला निर्णय, निनावी पत्रानंतर भाऊंच्या प्रश्नांना बाईंनी दिलेली प्रांजळ व पारदर्शी उत्तरे, वाकोदहून पाचोरामार्गे नाशिक रेल्वे प्रवास, अपवादात्मक जेल आवारात होणारा लग्न सोहळा, लग्न समारंभात आलेल्या पाहुण्यांचे वर्णन वाचून असे वाटते, की जणूकाही प्रत्यक्ष आपण स्वतःच या लग्नमंडपात होतो की काय?

बाईंच्या अशा शांत संयमी स्वभावामुळे भाऊंना आपल्या उद्योगाचे विशाल वृक्षात रूपांतर करता आले.

भाऊ निसर्गावर किती प्रेम करतात हे जैन हिल्सच्या हिरव्या रानांत जवळून बघायला मिळते. अनेक लहान-मोठे पशू, मोर-लांडोरसारखे पक्षी भाऊंनी पेरलेल्या सुमधुर फळांचा आस्वाद घेताना आपण बघतो. भाऊंनी लिहिलेलं पुस्तकपण वाचायला अगदी सोपं सरळ भाषेत सर्वांना आवडणारं असंच आहे. उंच डोंगरातून वाहत येणाऱ्या झऱ्यातील पाण्यासारखे नितळ मन भाऊंचे आहे, तसेच बाईंचेपण होते.

**रमेश पाटील,**
जळगाव.

●●●●●

समर्पक नांव आणि मुखपृष्ठाची कल्पना व मांडणी यामुळे पुस्तक प्रथम दर्शनीच आकर्षक झाले आहे. ङ्मॅजेस्टिकफ सारख्या प्रकाशकामुळे पुस्तकाच्या इतर बाबीदेखील दर्जेदार झाल्या आहेत. भाऊंच्या भाषाप्रभुत्वामुळे पुस्तकातला कोणताही प्रसंग वाचताना डोळ्यासमोर जसाचा तसा उभा राहतो. त्या प्रसंगात पुढे काय घडेल याची उत्सुकता वाढत जाते.

पुस्तक वाचताना आदरणीय बाईंबरोबरच्या सहवासातल्या काही आठवणी निघाल्या.

आम्ही जळगावात आलो, त्या वेळी श्री. भाऊंच्या सर्व व्यवसायाचा आलेख चढताच होता, घरामध्ये चांगली आर्थिक सुबत्ता होती. या गोष्टींचा जरासाही परिणाम बाईंच्या इतरांबरोबरच्या वागण्यावर झाला नाही. एका सुसंस्कृत घरातील सांसारिक स्त्रीप्रमाणेच त्या आपल्या मुलांवर व नंतर सुना, नातवंडांवर उत्तम संस्कार करीत होत्या, हे आम्ही पाहत होतो. त्यांच्या वागण्या-बोलण्यात कुठेही आढ्यता नव्हती. आमच्या मुलीच्या लग्नात आपल्याच घरातलं कार्य असल्यासारखी भाऊंनी व बाईंनी केलेली मदत आम्ही जन्मभर विसरणार नाही.

**जे.जे. कुळकर्णी,**
जळगाव.

योजकस्य तत्र दुर्लभः असे म्हणतात. ती आणि मी च्या निमित्ताने मला कल्पकस्य तत्र दुर्लभः म्हणावेसे वाटते. मलपृष्ठावरील आपणच आपली एकाच वाक्यात करून दिलेली ओळख याहून कांताभाभीचा सन्मान आणखी तो काय असणार. ती मागे मी म्हणणारे असे किती जण असतील?

प्रत्येक कर्तृत्त्ववान पुरुषामागे त्याची पत्नी हाल अपेष्टा सहन करत खंबीरपणे उभी असते. यामुळेच तो पुरुष आपली महत्त्वाकांक्षा, आपले ध्येय, उद्दिष्ट, योजलेले कार्य साकार करू शकतो. याचे जिवंत उदाहरण म्हणजे आमची कांताभाभी व तिचे कृतार्थ जीवन!

समाजाला यशोमंदिराच्या पायाचा दगड कधीच दिसत नाही त्याला दिमाखाने चमकणारा, झळझळता फक्त कळसच दिसतो. आपला हा सोनेरी कळस सदैव असाच चमकत राहो. परमेश्वराने आपणास आरोग्यपूर्ण दीर्घायुष्य द्यावे हीच माझी प्रार्थना.

**श्रीमती आशा मयुर,**
बॉस्टन.







# प्रकाशन सोहळ्यातील क्षणचित्रे

















